म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. ९५९४

७५९४

## दोन शब्द :

दोन तपापूर्वीची गोष्ट. बृहन् महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजात मी शिकत होतो. त्यावेळी आम्हा विद्यार्थ्यांना एक आगळे दृश्य पहायला मिळायचे ते असे...

कोणी **जुन्नरकर** आडनावाची एक माऊली आपल्या मुलाला रीक्षातून घेऊन यायची. रीक्षा थांबली की तीमधून सतरा-अठरा वर्षाच्या मुलाला कडेवर घेऊन त्या कॉलेजच्या पायरीपर्यंत पोहोचवयाच्या. मग तो अपंग मुलगा जमेल तसा वर्गात जायचा. कधी ती माता मुलाला बेंचवर आणून बसवीत असे. शिक्षणाबद्दल त्या मायलेकरांची ती धडपड सगळे विद्यार्थी अवाक् होऊन पाहात असत. ह्या जुन्नरकराने शिक्षणात उत्तम प्रगती व नेकीने चाकरी केली. अपंगाच्या कल्याणासाठी संस्था स्थापन केली. त्या जिद्दी मुलाची गोष्ट मनात घर करून राहिली. माझे प्रकाशक मित्र **राजा फडणीस**देखील ह्या घटनेचे साक्षीदार आहेत. दोन वर्षापूर्वी जेव्हा अपंग वर्ष जाहीर झाल्यावर पुन: एकदा तो काळ आठवला.

ख्यातनाम क्रिकेपटु **विजय मर्चंट**, सुप्रसिद्ध अभिनेत्री कै. **नर्गिस दत्त**, नट **सुनिल दत्त** व महाराष्ट्र राज्य सरकारचे बहुदा सगळेच **राज्यपाल** अंध, अपंग ह्यांच्या कल्याणासाठी अहोरात्र परिश्रम देत आहेत. त्यादृष्टीने निरनिराळ्या योजना कार्यान्वीत करीत आहेत. ह्या व मला ज्ञात नसलेल्या अनेक कार्यकर्त्यांबद्दल माझ्या मनात अतीव आदर आहे. माणसाने जन्मा यावे अन् इतरांसाठी काही करावे असं मी मानतो. म्हणूनच दानाबद्दल कुणी भूदान, वित्तदान, रक्तदान, श्रमदान, नेत्रदान अशा गोष्टी बोलू लागले की मी म्हणतो,

BVBK-0401594

किमान ' समयदान '. प्रत्येकाला त्याच्या आयुष्यातील थोडा तरी वेळ दुसऱ्याला द्यायला कठीण होऊ नये. रामाला सेतू बांधताना खारीने मदत केली. तसेच काहीसे समयदान करणाराबाबत म्हणता येईल. अशाच काही कल्पनेने अपंग वर्षानिमित्त मी केवळ ह्या विषयाला वाहिलेल्या गोष्टी लिहिण्याचा संकल्प सोडला. दरमहा एक प्रमाणे बारा कथा लिहिल्या. ' **जिद्दी मुले** ' हे पुस्तक म्हणजे त्या गोष्टींचा गुच्छ.


' जिद्दी मुले ' पुस्तकातील कथांतून एकेका अपंगाच्या जिद्दीची कहाणी सांगितली आहे. आर्थिक अपंगत्व असलेल्या गरीब मुलांच्या ह्यापूर्वीच अनेक कथा लिहिल्या आहेत. आज शारीरिकदृष्ट्या दुबळे असणारांच्या गोष्टी पुस्तकरूपाने सादर करीत आहे. मानसिक व बौद्धिकदृष्ट्या अपंगांच्या गोष्टी ह्या पुस्तकात पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे घेता आल्या नाहीत. परंतु कदाचित तसा दुसरा भागही प्रकाशित करण्याचा मानस आहे. प्रस्तुत पुस्तकातील बऱ्याच गोष्टीतील स्थळे, पात्रे खरी आहेत. त्या त्या व्यक्तींचे कार्य उल्लेखनीय आहे. क्वचितच त्यावर कल्पनेचा अथवा थोडा अतिशयोक्तीचा साज चढवला आहे.

प्रस्तुत पुस्तक लोकांना त्यांच्या मनातील आवेश अभंग ठेवण्यास व कुणाला अपंगांचे अश्रू पुसण्यास प्रेरणा देणारे ठरावे ही अपेक्षा.

—दत्ता श्री. टोळ

# १ अपंगमित्र राजा

१५१४ आपटे
वी. बा.
BVBK-0401594



दसऱ्याचा दिवस. पुणे शहर नित्याप्रमाणे जागे झाले. दिवस सणाचा असल्याने सगळीकडे आनंदाचे, उत्साहाचे वातावरण होते. मुले पाटी-पूजनासाठी शाळेस जाण्याची तयारी करण्यात दंग होती. दुकानदार आपापल्या दुकानाचे बोर्ड झेंडूच्या फुलांच्या माळांनी सजविण्यात गुंतले होते.

या आनंदाला, उत्साहाला पर्वतीकडे मात्र वेगळेच उधाण आले होते. पहाटे पाचपासून तिथे एक वेगळीच चुरस चालू होती. कुठल्याशा लायन्स क्लबने एक स्पर्धा जाहीर केली होती : ' जो कोणी जेवढ्या वेळा पर्वती चढेल, तितके रुपये त्या स्पर्धकाच्या नावाने एका अपंग कल्याणकारी संस्थेला द्यायचे ' अशी ती स्पर्धा होती. शिवाय जो सर्वांत अधिक वेळा पर्वती चढून जाईल त्याला ' अपंगमित्र राजा ' अशी पदवी बहाल करण्यात येणार होती.

सनईचे मंजूळ सूर ध्वनिक्षेपकावर स्पर्धकांना ऐकायला येत होते. पर्वतीच्या बाहेरील बाजूस पताकांच्या माळा लावल्या होत्या. दररोज नियमाने फिरायला म्हणून देखील पर्वतीवर येणाऱ्या प्रत्येकाच्या नावे एक रुपाया देणगीची पावती फाडली जात होती. अगदी छोट्या मुला-पासून पेन्शनर–वृद्धापर्यंत सगळ्यांच्या चेहऱ्यावर ती पावती घेताना वेगळे समाधान दिसत होते. तालमीतले पहिलवान, शाळा-कॉलेजमधील मुलं–मुली जिद्दीने या स्पर्धेत उतरली होती. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचे मित्र आले होते.

सकाळचे सहा वाजले. देदीप्यमान प्रकाशाच्या सूर्याने आपले कौतुकाचे हात या स्पर्धकांच्या पाठीवर फिरविले. तोच कुठलीशी पांढऱ्या रंगाची ॲम्बेसडर गाडी पायथ्याशी आली. गाडीतून बदामी रंगाचा सफारी सूट परिधान केलेले लायन्स क्लबचे अध्यक्ष उद्योगपती नंदकुमार गोखले उतरले. कोटावर गुलाबाचे फूल, पिढीजात श्रीमंतीचे चेहऱ्यावरील तेज, आकर्षक रंगाचा टाय, स्वकर्तृत्वामुळे चेहऱ्यावरील आत्मविश्वास यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांच्या नजरेत भरत होते. गोखले जसे आले तसा त्यांच्याभोवती कार्यकर्त्यांचा गराडा पडला.

' काय, ठीक चालली आहे ना स्पर्धा ? ' गोखलेंनी प्रश्न केला.

‘ उत्तम. बरेच लोक सहभागी झाले आहेत ’ कुणी तरी माहिती पुरवली.

‘ समर्थ मंडळाचे रजपूत आघाडीवर आहेत. ’

‘ अच्छा, आतापर्यंत किती वेळा जाऊन आलेत ते ? ’. गोखल्यांचा पुनः प्रश्न.

‘ पाच वेळा ’ कार्यकर्त्यांचे उत्तर.

‘ व्हेरी गुड. तरुण दिसताहेत ! ’ गोखल्यांनी आनंद व्यक्त केला.

‘ छे ! चांगले चाळीस वर्षांचे आहेत. ’

‘ सर, आणखी कुणी विश्वेवर रास्ते नावाचा पंचविशीतला मुलगा त्यांच्याबरोबरीने चढतोय. ’

‘ चला, पाहू या तर ’ म्हणत गोखले, लायन्स क्लबचे काही सभासद व कार्यकर्ते पर्वतीवर निघाले.

महाराष्ट्र बँकेतील तो तरुण विश्वेश्वर रास्ते आणि रजपूत अक्षरशः ठरल्याप्रमाणे एकाच वेळी एक-एक पायरीवर चढत होते. कुणी फारसे दमले नसल्याने मधूनच एकमेकांकडे हसून बघत दोघांची चुरस चालू होती.

सकाळचे सात वाजून पाच मिनिटे झाली. आकाशवाणीवर मराठीतून प्रादेशिक बातम्या सुरू झाल्या. निवेदिकेने म्हटले, ‘ आता पुण्यात पर्वती चढण्याची स्पर्धा सुरू झाली असून त्यातून जमा होणारा निधी एका अपंग कल्याणकारी संस्थेस देण्यात येणार आहे. ’ नंतर निवेदिकेने स्पर्धेचा थोडा तपशील सांगितला. ही बातमी अनेकांप्रमाणे सदाशिव पेठेतील राममंदिरात राहणाऱ्या कृष्णा राजूरकर नावाच्या मुलाने ऐकली. कृष्णा दहा वर्षांचा, चौथ्या इयत्तेत शिकणारा मुलगा. जन्मापासून दोन्ही पायाने थोडा पांगळा. कृष्णा आईला म्हणाला,

‘ आई मला पर्वतीकडे घेऊन चल. ’

‘ कशाला ? ती स्पर्धा बघायला ? ’ आईने प्रश्न केला.

‘ अं हं. मी देखील स्पर्धेत भाग घेणार आहे, ’ कृष्णाचे ते उत्तर ऐकून कृष्णाच्या आईच्या डोळ्यांत टचकन् पाणी उभे राहिले. डोळे पुशीत ती माऊली म्हणाली,

‘ अरे, तू कसा पर्वती चढणार ? ’ त्यावर कसल्याशा निश्चयाने कृष्णा म्हणाला, ‘ पाहीन प्रयत्न करून. ’

कृष्णाला कधी नाउमेद करायचे नाही, असे कृष्णाच्या आईचे व्रत होते. ‘ आपण ती स्पर्धा बघायला जाऊ. तिथं गेल्यावर पाहू काय कारायचं ते ’ म्हणत कृष्णाची आई कृष्णाला कडेवर घेऊन बाहेर पडली. दोघे रिक्षाने पर्वतीच्या पायथ्याशी आले. एव्हाना आठ वाजले होते.

‘ बक् अप विशू. ’

‘ रजपूत, जोरसे चलो, ’ असे विश्वेश्वर ऊर्फ विशू व रजपूतला त्यांचे नातेवाईक, मित्र व चाहती मंडळी प्रोत्साहन देत होती. पुण्यातील तमाम वर्तमानपत्रांची बातमीदार मंडळी ‘ आँखो देखा हाल ’ पाहण्यास उपस्थित झाली होती. तर छायाचित्रकारांच्या फ्लॅशगन्स निरनिराळ्या स्पर्धकांची छायाचित्रे टिपत होती.

इकडे कृष्णाने आईजवळ हट्टच धरून पहिल्या पायरीवर सोडायला सांगितलं. आई त्याची समजूत काढीत होती, ‘ तुला जमणार नाही; त्रास होईल ’ म्हणत होती.

‘ आई, सेतू बांधायला खारीने मदत केली. तेव्हा मीही माझ्या भावंडांसाठी नको का काही करायला ? ’ कृष्णाचा हा प्रश्न बिनतोड होता. त्यासाठी म्हणून पर्वती चढू देण्यासाठी त्याला पायरीवर उतरवणे एवढंच उत्तर होतं. कृष्णाच्या आईने पदराने डोळे पुशीत ते केले. काखेत कुबड्या घेत कृष्णा पर्वती चढू लागला. स्पर्धा बघणारे अवाक् झाले.

सगळ्यांच्या चेहेऱ्यावर आश्चर्य होते. कृष्णाचे कृश पाय पाहून कुणाला त्याची कीव आली.

एक कार्यकर्ता कृष्णाजवळ जात त्याला म्हणाला, ' तू पर्वती चढू नकोस. खूप त्रास होईल तुला. '

' अंऽऽहं, मी चढणार. मला या निधीसाठी एक रुपया द्यायचा आहे. ' कृष्णाचे उत्तर.

' मी देतो रुपया तुझ्या वतीनं ' तो कार्यकर्ता म्हणाला.

' छट, मला माझ्या कमाईचा द्यायचाय. नाहीतर माझ्या आईनं दिलाच असता की; हो की, नाही आई ? ' म्हणत कृष्णाने आईकडे पाहिले.

कृष्णाच्या आईने मानेनेच संमती दर्शविली. कार्यकर्ता बाजूला झाला.

कृष्णा पर्वतीच्या पायऱ्या चढू लागला. वेग होता कासवाचा.

एक....दोन....तीन....दहा पायऱ्या चढून झाल्या. सर्वांचे डोळे आता कृष्णावर खिळले होते. कुणी दोन-पाच वेळा चढून दमले होते. विश्वेश्वर व रजपूत यांचा विक्रम मोडण्याचा प्रयत्न चालूच होता. तोच दूरदर्शन केंद्राची गाडी आली. स्पर्धा पाहणाऱ्यांत, कार्यकर्त्यांत थोडी चुळबूळ झाली. टी. व्ही. च्या लोकांनी योग्य ठिकाणी प्लग जोडले. वायर लावली गेली. अन् कॅमेरा सुरू झाला.

फरऽऽ फरऽऽ आवाज येऊ लागला. लंगडा बाळकृष्ण, त्याची आई, विश्वेश्वर अन् रजपूत, प्रेक्षक, इतर स्पर्धक, लायन्स क्लबचे सभासद अन् गोखलेसाहेब चित्रबद्ध होऊ लागले.

वेळ सकाळची अकराची. विश्वेश्वर, रजपूत अन् बाळकृष्ण घामाने डबडबले होते. बाळकृष्ण शेवटच्या पायरीवर पोहोचला आणि लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. कुणी त्याला खांद्यावर घेऊन नाचू लागले. रजपूत आणि विश्वेश्वरची पन्नासावी फेरी पूर्ण झाली होती. दोघेही

ठरवून थांबले. त्या दोघांना देखील जमलेल्या मंडळींनी उचलले. दोघांच्या नावाचा जयघोष केला.

गोखले बोलू लागले, ' मित्रहो, पराक्रमाचा स्फूर्तिदिवस म्हणजे दसरा. अपंग वर्षानिमित्त आम्ही ही स्पर्धा आयोजित केली होती. यातून चार हजार रुपये जमले. मी वैयक्तिक माझी एक हजार रुपयांची भर टाकून पाच हजार एकची थैली अपंग कल्याणकारी संस्थेच्या अध्यक्षांच्या स्वाधीन करतो. पर्वती चढण्याचा विक्रम करणाराला ' अपंग मित्रराजा ' ही पदवी व लायन्स क्लबचा मुकुट द्यायचा होता. विश्वेश्वर रास्ते आणि रजपूत दोघेही या पदवीचे मानकरी ठरले आहेत. तेव्हा या दोघांना ' अपंग मित्र राजा ' पदवी जाहीर करतो. प्रश्न आहे तो हा मानाचा मुकुट दोघांत कसा द्यावयाचा हाच.... ' हे शब्द ऐकताच विश्वेश्वर रजपूतच्या कानात काही बोलून धावत माईकजवळ गेला अन् म्हणाला, ' मित्रहो, हा मानाचा मुकुट खऱ्या अर्थाने आजचा पराक्रमी वीर कृष्णा राजूरकर याचा आहे. तो त्याला अर्पण करावा, अशी माझी व रजपूत याची विनंती आहे. ' टाळयांच्या कडकडाटात कृष्णाच्या डोक्यावर मुकुट ठेवला गेला. आणि तो दसरा आगळ्या समारंभाने साजरा झाला.

# २ शिरपाला शिरपेच

गणपतीचे दिवस होते. मुलांना गोष्ट सांगण्यासाठी चंबळच्या खोऱ्यापलिकडील एका गावी मी निघालो होतो. चंबळ म्हणजे दरोडे-खोरांची वस्ती म्हणून मनात भीती होती. पाहू या तो अजब गाव असा हिय्या करून मी तिथे पोहोचलो.

गावचे सरपंच मला घ्यायला आले होते. आम्ही बोलत निघालो. तो मोठा रस्ता होता. मध्येच एके ठिकाणी एक पुतळा दिसला. एका कुमार वयातील मुलाचा तो पुतळा होता. मी खूप आठवून पाहिलं पण तसा कुणी देशभक्त वा क्रांतिकारक असल्याचे मला आठवेना.

'कुणाचा हा पुतळा ?' मी सरपंचांना विचारलं. सरपंच सांगू लागले.

'ती एक मोठी हकीकत.'

'सांगा तर खरं' असं मी म्हटल्यावर सरपंच सांगू लागले.

'फार जुनी गोष्ट नाही. असेल काही वर्षापूर्वीची.'

चंबळच्या खोऱ्याच्या सीमेवरचे एक गाव. सीमेपलिकडील खोऱ्यात दरोडेखोरांचे मोहोळ होते. मात्र ह्या मोहोळाला दगड न मारता किंवा त्याची खोडी न काढता मोहोळातील दरोडेखोररूपी गांधीलमाशा लहर लागेल तेव्हा इतरांवर हल्ला करत. साऱ्या गावाला असा काही कडाडून चावा घेत, की ज्याला डंख बसायचा त्याला प्राणच गमवावे लागत. वृत्तपत्रात बातम्या येत.

गावावर दरोडेखोरांचा हल्ला.

गाव दरोडेखोरांनी लुटून नेले.

तीन बळी. पाच जखमी.

• ह्या बातम्या वाचून वाचकांच्या अंगचा थरकाप उडायचा. सीमेवरचे ते गाव देखील जीव मुठीत घेऊन जगत होते. आपल्यावर देखील आज

ना उद्या ते संकट उभे ठाकणार याची त्यांना कल्पना होती. फक्त तो तो काळा दिवस कधी उजाडणार एवढेच कुणाला ठाऊक नव्हते.

दिवस मावळू लागला की गावकऱ्यांची तोंडे काळवंडून जात. भीतीची छाया त्यांना ग्रासू लागायची. लहान मुलांना बागुलबुवा आला म्हणून घाबरवले जाते; पण त्या गावाला ' दरोडेखोर आले ' ह्या न उच्चारल्या जाणाऱ्या शब्दाची मनोमन धास्ती होती.

आणि एक दिवस ती काळरात्र उजाडली. नेहमीप्रमाणे गावकऱ्यांनी गुरे गोठ्यात बांधली. स्त्रिया स्वैपाक करण्यासाठी चूल पेटवू लागल्या. बालगोपाल दिव्याच्या अंधूक प्रकाशात अंगणात खेळत होते.

—गावचे गोविंदराव कुलकर्णी हे अंगणातील झोपाळ्यावर पानाचा विडा करण्यासाठी अडकित्त्याने सुपारी कातरत होते. गडी-माणसे बैलाला चारा घाल, धान्याची कणगी नीट लावून ठेव, खुंटीवर कासरा ठेऊन मातीच्या तेलाचे ( रॉकेलचे ) दिवे लाव अशा कामात गढून गेली होती. तेवढ्यात गोविंदराव ओरडले,

' अरे, तांबू गाय का ओरडते आहे बघ. ' मालकाची हाक ऐकून राजू बोलला, ' काही नाही धनी. तिची धार काढायची वेळ झालीय. म्हणून वरडत असंल. '

' अरे, मग लवकर जा. मुक्या जनावराला ताटकळत ठेवू नये. ' गोविंदरावांची आज्ञा होताच ' व्हय जी ' म्हणत राणू पळत निघाला. तेवढ्यात पडवीवरून धावत येऊन शिरपाने राजूला मिठी मारली अन म्हटले, ' बाप्या, आज मी धार काढणार. '

' आरं तू लहान हैस. तुला नाय यायचं. ' राणू बोलला. हात आढ्याकडे उंचावीत शिरपा बोलला,

' हा काय, मी मोठा झालो. ने मला. ' मोठं होऊन दाखवण्याची

आपल्या पोराची युक्ती पाहून राजू खूष झाला. त्याबद्दल पसंतीची पावती देण्यासाठी खळाळून हसत तो बोलला,

'व्हय व्हय. तू लई मोठा झालायसा. पर आता मालकासंगती बसा. काय लागलं तर पगा. उद्यापासून धार काडायला नील तुमाला.'

'शप्पत ?' भोळ्या शिरपाने वडलांना प्रश्न केला.

'हां ऽऽ आक्षी माज्या गळ्याची शप्पत.' म्हणून राणूने आपल्या गळ्याकडे हात घातला. वडलांचा हात आपल्या हातात घेत शिरपा म्हणाला, 'सुटली म्हन.'

राजू बोलला 'सुटली' अन् राणू अन् गोविंदराव मनापासून हसले. राजू धार काढायला गेला. शिरपा गोविंदरावांच्या जवळच्या एका खांबाला पाठ टेकवून उभा राहिला अन् म्हणाला, 'मालक, सांगा काम.'

'अरे, आत्ता ह्या वेळेला अन् तुला कसलं काम सांगणार ?'

'कायबी सांगा, बानं सांगितलंय.'

'अस्सं अस्सं. राणूने बजावलं म्हणून विचारतोस होय. तर मग थांब इथेच राखणीला. दरवाज्याकडं लक्ष दे. कुणी आलं तर सांग.' गोविंदराव त्याला काही तरी काम सांगायचं म्हणून बोलले. त्यावर शिरपा म्हणाला,

'तर मग मी तथंच हुबा ठाकतो.'

'बरं बरं, जा.' गोविंदरावांनी शिरपाला परवानगी दिली. शिरपा दाराजवळ जाऊन उभा झाल्याला पाच मिनिटे झाली असतील नसतील तोच शिरपाच्या कानावर घोड्याच्या टापांचा आवाज आला.

टॉ ऽ क टॉ ऽ क असा एका लयीतील तो आवाज ऐकून शिरपाच्या काळजात धस्सं झालं. त्याने ओळखलं की ती दरोडेखोरांची टोळी आहे.

‘ मालक, ऐकली न्हवं ही घोडदौड ? ’ शिरपाचा प्रश्न.

‘ ऐकली तर ! हे रोजचंच आहे. चालले असतील कुठं तरी दरोडा घालायला ! ’ गोविंदराव बेफिकीरीनं बोलले.

‘ नाही, पण आवाज आपल्या वाड्याच्या दिशेनं येतोय. ’ शिरपा.

‘ छे ! असं कुठं झालंय. आपण दरोडेखोरांचे शेजारी. त्रास नाही द्यायचे ते आपल्याला. ’

‘ नाही — पण — ’ शिरपाचं ते शंकेखोर बोलणं अर्ध्यावर तोडीत गोविंदराव बोलले,

‘ तर मग घे दार लावून. उगाच काळजी नको. अन् तुला देखील समाधान वाटेल. ’

शिरपा दिंडी दरवाजाकडे निघाला तोपर्यंत घोड्यांच्या टापांचा आवाज दाराजवळ येऊन थडकला होता.

‘ धनी ऽ ऽ ’ शिरपानं घाबरून किंकाळी फोडली अन् तो भक्कम दरवाजा लोटला. तोच पलिकडून एका दरोडेखोराने दार ढकलण्यास सुरुवात केली. वाड्यातील सगळे नोकर-चाकर काठ्या, कुऱ्हाडी घेऊन धावले. गोविंदरावांनी बंदूक आणली. आता दरोडेखोर आणि वाड्यातील लोक यांची रस्सीखेच सुरू झाली. दार थोडेसे उघडले जायचे अन बंद व्हायचे, हाच खेळ पुनः पुन्हा होत राहिला. ह्या धामधुमीत दाराच्या फटीत शिरपाचा हात अडकला.

‘ आई ऽ ऽ ’ शिरपा कळवळून ओरडला.

आता दाराची रेटारेटी जोरात सुरू झाली. राणू ओरडला, ‘ पोरा, दूर हो, नाही तर तुझा हात तुटून पडेल. ’

‘ नाही बा. तसं झालं तरी चालंल, पर दरोडेखोरांना आत घेणार नाही. ते समद्यास्नी मारतील. ’

गोविंदरावांनी हवेत बंदूक उडवली अन् दरोडेखोरांना म्हटलं, 'मुकाटपणे माघार फिरा. नाही तर एकेकाला गोळी घालून ठार करीन.'

दरोडेखोरांनी जुमानले नाही. दार उघडण्याचा ते नेटाने प्रयत्न करीत होते. आता शिरपाच्या हातातून रक्त गळू लागले. दाराच्या वाड्यातील भागावर रक्ताचे ओघळ दिसू लागले.

'शिरपा, पोरा बाजूला हो.' राणू कळवळून विनंती करीत बोलला· गोविंदरावांचे पाय धरून तो म्हणाला, 'धनी, वाचवा हो माझ्या पोराला.'

गोविंदराव दरोडेखोरावर मनोमन आग ओकीत होते. रक्ताची ती धार पाहून त्यांच्या क्रोधाचा भडका उडला.

त्यांनी वाड्यातून दूरवर हातबॉंब टाकला अन् म्हटले, 'आता जर का तुम्ही हालला नाहीत, तर मात्र अशाच एका बॉंबने तुम्हा सर्वांना उडवून टाकीन.'

गोविंदरावांची बॉंबची ती धमकी लागू पडली. तेवढ्यात दूरवर पोलिसांच्या गाड्यांचा आवाज येऊ लागला. तशी त्या दरोडेखोरांनी पळ काढला. पोलिसांच्या गाड्या बाहेर आहेत याची खात्री पटल्यावर गोविंद-रावांनी दार उघडलं. तोपर्यंत शिरपा बेशुद्ध होऊन खाली कोसळलेला होता. त्याच्या डाव्या हाताची बोटे चरकात घालावीत तशी पिळून निघाली होती.

'पोरा ऽ काय झालं रं हे!' म्हणत रडू लागला. शिरपाला जिल्ह्याच्या गावी मोठ्या दवाखान्यात नेले. पण काही इलाज चालला नाही. त्याचा हात मनगटापासून कापावा लागला.

शिरपामुळे दरोडेखोर पळाले.

शिरपामुळे गोविंदरावांचे घर वाचले.

शिरपामुळे सगळे गाव बचावले.

साऱ्या गावाने शिरपाचे कौतुक केले.

गावातल्या आया-बहिणींनी त्याची दृष्ट काढली.

पुढे गोविंदरावांनी शिरपाची सगळी जबाबदारी घेतली. त्याला लहानाचा मोठा केला. त्याला कशाची ददात पडू दिली नाही. त्याच्या हयातीतच त्याचा गावातील हमरस्त्यावर मध्यभागी पुतळा उभा केला.

आता गाव बदलले.

खूप सुधारणा झाल्या.

परंतु अपंग शिरपाचा पुतळा उद्याच्या पिढीला गाव पाहावयास येणाऱ्या प्रवाशांना साहसाचा, त्यागाचा मंत्र देत उभा आहे.

ती हकीकत ऐकून मी भारावलो. शिरपासमोर मी मनोमन नतमस्तक झालो. गावोगावी कथाकथनाच्या वेळी मी गोष्ट आवर्जून सांगत असतो.

## ३ जगूची सोनेरी कहाणी




ही गोष्ट आहे एका मुलाची. त्या मुलाच्या कर्तृत्वाची. त्याच्या कृतज्ञतेची. पाडवा जवळ आला की त्याची मला हमखास आठवण होते.

गोष्टीला सुरुवात होते जगू दहा वर्षांचा होता तेव्हापासून. जगू हा तो त्याच्या आई-वडिलांच्या सुखाला लहानपणीच पोरका झालेला. वडील थकलेले, फारसा काम-धंदा करू शकत नव्हते. मग गुजराण

कशी व्हायची ?

तेव्हा एकदा जगूची म्हातारी आई जगूला म्हणाली, ‘ जगू, शाळा सोड. कुठे तरी कामधंदा पाहा. ’ ते शब्द ऐकून बिचारा जगू हिरमुसला. म्युनिसिपालिटीच्या शाळेतलं नाव त्याने काढले. शिक्षण अर्ध्यावर राहिले. खूप शिकायचे हे जगूचे स्वप्न होतं. पण ते स्वप्न, स्वप्नच राहिले. काही काम मिळतं का ह्या शोधात जगू घराबाहेर पडला. वणवण भटकू लागला. पुण्यातील गल्ली अन् बोळ, दुकाने आणि ऑफिसेस त्याने पालथी घातली पण लवकर कुठे डाळ शिजेना. एवढ्या लहान मुलाला नोकरी देतो कोण ? हॉटेलमध्ये नाही तर थिएटरमध्ये काम मिळाले असते. पण जगूला तसले काम नको होते. तिथली मुले चांगली नसतात हे कधी तरी गुरुजींच्या तोंडून जगूने ऐकले होते.

भटकता भटकता एके दिवशी जगूने शनिपाराजवळील एक बोर्ड वाचला. बोर्डावर लिहिले होते.—‘ शिशुनिकेतन पूर्व प्राथमिक शाळा. ’

जगू तिथे थबकला. त्याची आशाळभूत नजर त्या इमारतीच्या आतील दृश्याची कल्पना करू लागली.

‘ बे एके बे, बे दुणे चार ’ एका वर्गात पाढे चालू होते. ‘ किलबिल किलबिल पक्षी बोलती, ’ दुसऱ्या वर्गातून तालासुरावर हे गाणे जगूच्या कानी पडले. जगू शाळेच्या लोखंडी फाटकाजवळ गेला. पांढरा फ्रॉक घालून पऱ्यासारख्या दिसणाऱ्या मुली नाचत गाणे म्हणत होत्या. खाकी पॅन्ट व पांढरा शर्ट अशा गणवेशातील मुलांचे पाढे घोकणे चालू होते.

जगूला पाहून शाळेच्या मोठया – मालतीबाई – बाई फाटकाजवळ आल्या. दोघांच्यामध्ये असलेले गजाचे फाटक उघडीत त्या जगूला म्हणाल्या, ‘ बाळ, काय हवंय तुला ?

‘ बाळ ’ शब्द ऐकून जगूचे काळीज गलबलले. तो हमसाहमशी रडू लागला. त्याच्या पाठीवरून मायेने हात फिरवीत बाईंनी जगू कोण,

कुठला, विचारले. जगूने मुसमुसतच त्याची सगळी हकिकत सांगिली.

जगूच्या हातावर खाऊ ठेवीत बाईंनी त्याला काम दिले. काम होते शाळेच्या जवळच्या मुलांना ने-आणण्याचे.

दुसरे दिवशी त्याप्रमाणे जगू शाळेत आला. अगदी जवळच्या मुलांना तो दोन-दोन, तीन-तीनच्या गटाने चालत आणायचा. थोड्या दूर अंतरावरच्या मुलांसाठी त्याला बाईंनी शाळेची सायकल दिली.

ट्रिंग ट्रिंग घंटा वाजवीत जगूची सायकल निघायची. आता सायकल-वरच्या मुलांकडून छान छान गोष्टी, गोड गोड गाणी जगूला ऐकायला मिळू लागली. जगू तमाम छोट्यांचा दोस्त बनला. त्याला दूरवरून येताना पाहिले की मुले ओरडत, ' जगू आला, जगू आला. '

एक दिवस गेला. दोन महिने गेले. अशीच काही वर्षे लोटली.

आता त्याला शाळेशेजारच्याच बाबूकाका गोडबोले ह्यांच्या ओळखीने पावसकरांच्या लोखंडी सामानाच्या दुकानातही काम मिळाले. जगूचे दिवस आनंदात चालले होते. जगू आता मोठा झाला अन् रस्तारुंदीमुळे ती शाळा अन् लोखंडी सामानाचे दुकान पाडण्यात आले.

' आता आपण काय करायचे ? ' जगू पुढे मोठा प्रश्न उभा राहिला. कसले तरी दुकान थाटावे असे त्याला वाटू लागले.

दुकान कसले ? भाजीचे की वाणसामानाचे ?

छे ? ही देखील दुकाने चांगली. पण असले दुकान नको आपल्याला. शिक्षणाबद्दल ओढ असणाऱ्या जगूला पुस्तकाचे दुकान थाटण्याची इच्छा झाली. त्यासाठी हवे होते खूप पैसे. चांगल्या जागेची आवश्यकता होती. सदैव अशा विचारचक्रात असलेल्या जगूच्या खांद्यावर एकदा कुणी तरी हात ठेवले. जगूने चमकून मागे पाहिले. त्याच्याजवळ उभा होता अण्णा अय्यंगार. त्याचा एक शेजारी. मद्रासहून आलेला अय्यंगार मोठा प्रेमळ होता. जगूची अडचण त्याला कुणी तरी सांगितली. आपल्या

हातातली अर्ध्या तोळ्याची सोन्याची अंगठी जगूला देत अण्णा बोलला, ' तू जुन्या पुस्तकाचं दुकान सुरू कर. '

जगूच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. जगूने ती अंगठी मोडली. रस्त्यावरच जुन्या पुस्तकांचे दुकान थाटले. बसायला खोके, फूटपाथवर पसरलेली पुस्तके असे जगूचे दुकान सुरू झाले. जोडीला रद्दी खरेदी-विक्री करण्याचा कुणी सल्ला दिला. अन् पाडव्याच्या मुहूर्तावर जगूच्या गुरुदत्त रद्दी डेपोचा बोर्ड एका दुकानावर लागला.

शाळेतील मुलांचे पालक जगूचे गिऱ्हाईक झाले. जगूने छोटी जागा घेतली. जगूला बरे दिवस आले. चांगली बरकत होऊ लागली. प्रत्येक पाडव्याच्या दिवशी जगू अण्णा अय्यंगाराला उपकाराची परतफेड म्हणून काही रक्कम देऊ लागला. अण्णा पैसे घेण्यास राजी नसायचा, परंतु जगू बळेच त्याच्या घरी पैसे ठेवून येई.

दहा वर्षे लोटली. आता जगू जगन्नाथशेठ म्हणून ओळखला जाऊ लागला. जगू एका पाडव्याच्या दिवशी अण्णाच्या घरी गेला. अण्णांच्या हातात सोन्याची एक तोळ्याची अंगठी ठेवीत जगू त्यांना वाकून नमस्कार करू लागला. तोच त्याला उठवून मिठीत घेत अण्णा बोलला. ' अय्यो, जगूशेठ पुष्कळ पैसे दिले मला. ही अंगठी कशाला ? '

जगूने हळूच डोळे पुशीत म्हटले, ' आता जमेल तेवढे दिवस प्रत्येक पाडव्याला तुम्हाला अंगठी देणार. तरी तुमचे उपकार फिटायचे नाहीत. ' काही वर्षांनी अण्णा अय्यंगार कायमचे गेले. त्यांना मृत्यूने गाठले.

आता पाडव्याला अंगठी कुणाला देऊ ? जगूला प्रश्न पडला. काका पावसकरांनी त्याला सांगितलं, ' कुठल्या तरी गरजू संस्थेला मदत कर. ' जगूने सल्ला मानला. आजही दर पाडव्याला जगू एखाद्या संस्थेला जमेल तेवढी मदत करतो—अण्णांची आठवण म्हणून.

अशी आहे जगूच्या कृतज्ञतेची कथा.

# १२ जुलै १९६१ ची गोष्ट



छोट्या दोस्तांनो,

माझं नाव सुधाकर सोहोनी. मला आहे गोष्टी सांगण्याचा छंद. शाळा-शाळांतून, सभा-संमेलनातून मी कथाकथन करतो. ज्ञानरंजन मेळाव्यात सहभागी होतो.

१२ जुलै १९६२ पासून कित्येक वर्षे माझा हा कार्यक्रम अव्याहतपणे चालू आहे. मी एखादी विनोदी गोष्ट सांगितली की मुलं खळाळून मोकळेपणानं हसतात. ते हसणं मला झऱ्याचं गुणगुणणं वाटतं. ती हास्यफुले मला हिरे–माणकाप्रमाणे मोलाची वाटतात अन् जर का मी एखादी 'श्यामची आई 'सारखी ऐकणाराला रडू येईल अशी गोष्ट सांगितली की तुम्हा मुला-मुलींच्या डोळ्यात अश्रू उभे राहतात. माणसाचं मन शुद्ध करणारे ते अश्रू पृथ्वीमोलाचे असतात.

सुधाकर सोहोनीचं नाव ठाऊक नाही असा एकही विद्यार्थी उभ्या महाराष्ट्रात सापडणार नाही. आज माझी एक खोड आहे, कथाकथन करण्याच्या जागी मी कधी सर्वांसमक्ष जात नाही. सर्वप्रथम मी हॉलमध्ये, किंवा जिथं गोष्ट सांगायची आहे तिथं जाऊन बसतो. माझ्यानंतर सग-ळ्यांनी यायचं ही माझी पहिली अट असते. दुसरी खोड किंवा अट म्हणा हवं तर, मी खुर्चीत बसूनच गोष्ट सांगतो. अनेक बालगोपाळ मला त्याबद्दल विचारतात. त्यावर मी फक्त हसतो. तेवढंच माझं उत्तर असतं. मी ऐतिहासिक, पौराणिक, परिकथा, साहसकथा, शेकडो गोष्टी सांगितल्या. गोष्टी सांगण्याचे माझे हजारचेवर कार्यक्रम झाले.

आज १२ जुलै १९८३. सानेगुरुजी विद्यामंदिरात माझं कथाकथन आहे. पण तुम्ही सगळेच त्या शाळेत येऊ शकणार नाही हे मला ठाऊक आहे. तिथं मी जी गोष्ट सांगणार आहे, ती तुम्ही सर्वांनी ऐकावी अशी माझी फार इच्छा आहे. म्हणूनच त्या शाळेत येऊ न शकणाऱ्यां-साठी ती कथा लिहून वाचायला देत आहे. तिथं काय होईल ते सांगतो.

सानेगुरुजी विद्यामंदिरात मी पावणेचार वाजता पोहोचेन. कार्यक्रमाचा हॉल रिकामा असेल. मी प्रथम जाऊन खुर्चीवर स्थानापन्न होईन. स्वागत, पाहुण्यांची ओळख, गुच्छगोटे देणे हा सभेचा औपचारिक भाग संपेल. मग मुलांना मी विचारणार आहे, 'मुलांनो, तुम्हाला इतिहासातील,

गोष्ट सांगू की खरीखुरी घडलेली ? '

'आम्हाला डिट्टो खरी गोष्ट सांगा' मुलं असंच उत्तर देतील ही माझी खात्री.

'ठीक आहे तर. मग मी तुम्हाला अगदी खरीऽ खुरीऽऽ घडलेली गोष्ट सांगतो.' असं म्हणून खुर्ची पुढे सरकवून मी गोष्ट सुरू करीन.

'बालमित्रांनो आणि मैत्रिणींनो, आजपासून बरोबर २२ वर्षांपूर्वी घडलेली ही गोष्ट पुण्यातच घडली.

१२ जुलै १९६१ चा दिवस पुणे शहराच्या दृष्टीनं 'काळा दिवस'. खरं तर त्या दिवशी नेहमीप्रमाणंच पुणे शहर आनंदानं जागं झालं होतं. दूधवाले, पेपरवाले, आपापली कामं नेहमीसारखी धावपळीनं करीत होते. तुमच्यासारखी शाळेत जाणारी मुलं गृहपाठ लिहून काढीत होती.

दिवस पुढे सरकत होता. वेळ अकराची झाली. आता शाळा, कॉलेजं विद्यार्थ्यांनी फुलू लागली होती. ऑफिसच्या दिशेनं बसेस, स्कूटर्स धावत होत्या. सगळे कसे नेहमीप्रमाणे घडत होते.

तोच कुठेतरी पाल चुकचुकली. कसल्या तरी न दिसणाऱ्या ढगांनी अंधारून आलं. अन् संभाजी पुलाखालून नदीचं पाणी जोरात वाहू लागलं. पाण्याचा जोर वाढला, त्याला वेग आला. मुठा नदीनं आता वेगळंच रूप धारण केलं. नव्या पुलाखालून जाताना तर तिनं एखाद्या कैदाशिणीसारखा अवतार धारण केला. केस मोकळे सोडलेली, कपाळी मळवट भरलेला, हात नाचवत कुणाचा तरी घास घेऊ पाहणाऱ्या महामायेप्रमाणं ही नदी रोरावत धावू लागली. कुणी तरी म्हटलं, 'नदीला पूर आला.'

पूर पाहायला बायका, पुरुष, मुले धावू लागली. पुलावर गर्दी झाली. गर्दीतला एक खेडूत म्हणाला, 'काल पानशेतला पाऊस झालेला दिसतुया.'

कुणी म्हातारे पेन्शनर म्हणाले, 'शिंच्यांनो, पाऊस झाला म्हणून काय झालं ? एवढा पूर ? गेली पन्नास वर्षात पाहिला नाही. खडकवासला धरणाच्या मोऱ्या मोकळ्या केल्या असतील, काय समजलास ?' त्या म्हातारबाबांचं बोलणं पूर्ण व्हायच्या आत सगळीकडे धावाधाव, पांगापांग सुरू झाली.

'पानशेत धरण फुटलं' अशी बातमी कुणीतरी दिली. पराचा कावळा न्यायानं 'आता अर्धं पुणं बुडणार' अशी हूल उठली. प्रत्येकजण जीव वाचविण्यासाठी धावू लागला. कुणी आपल्या मुलांना घेण्यासाठी पळू लागले, कुणी तळमजल्यावरच्या सामानांची बांधाबांध करून वरच्या मजल्यावर जाऊन बसले.

'छ्याऽ एवढा काय पूर येतोय ! आम्ही पुण्यातले छप्पन्न पूर पाहिल्येत' म्हणणारे मात्र फाजील विश्वासानं गप्प राहिले. अंगात आलेल्या राक्षसासारखा पूर वाढू लागला. नदीकाठच्या घरांचा त्याने केव्हाच घास घेतला होता. आता तो शहराकडे धावू लागला.

संभाजी पुलावरून वाहणाऱ्या पाण्याने चौकातील 'कळशीवाली'चा पुतळा केव्हाच उखडून दूर केला होता. अनाथ हिंदू महिलाश्रमातल्या स्त्रिया व मुली गच्चीवर जाऊन बसल्या. लक्ष्मीरोड पार करण्यासाठी दोराच्या सहाय्याने झुलता पूल टाकून त्यांना पलीकडे सुरक्षित जागी नेलं जात होतं. अठरा वर्षांचा कुणी तरुण मुलगा मोठ्या धाडसानं एकेकाला बाहेर काढत होता.

तोच....

तोच कुणीतरी त्याला म्हटलं, 'अरे, तू इकडं सगळ्यांना वाचवतोस ते ठीक आहे, पण तुझ्या घरची परिस्थिती पाहिलीस का ?'

आपल्या जागी आपल्या मित्राला उभं करून तो तरुण सुसाटपणे स्वतःच्या घराकडं धावत सुटला. त्याचं घर अलका टॉकीजच्या कोपऱ्यावर दुसऱ्या मजल्यावर होतं. तो घराजवळ येऊन पाहतो तो घराचा पहिला मजला पाण्यात होता. त्याने कुठून तरी जाड दोरखंड आणला आणि त्याचं एक टोक दुसऱ्या मजल्याकडे फेकलं. एखाद्या घोरपडीप्रमाणं तो सरसरसर त्या दोरखंडावरून स्वतःच्या घरापर्यंत पोहोचला. पाणी वाढतच होतं. पुनः तीच कसरत. दोरखंडाचं टोक दुसऱ्या बिल्डिंगकडे टाकून त्यानं एकेकाला बाहेर काढलं.

आता दुसऱ्या मजल्यावर तो एकटाच उरला होता. तोच त्याच्या कानावर ट्यांऽहऽऽट्यांह असा आवाज आला. आवाजाच्या दिशेने शेजारच्या खोलीत मुसंडी मारावी तसा तो घुसला. त्या बाळाचं मुटकुळं पाठीशी घेऊन तो खिडकीजवळ आला. पाहतो तो रस्त्यावर कुणी बाई छाती बडवून रडत होती. 'माझ्या बाळाला वाचवा' असं ओरडत होती. ती त्या बाळाची आई आहे हे तरुणानं ओळखलं. एका इमारतीवरून दुसऱ्या, तिसऱ्या इमारतीवर उडी घेत तो पळू लागला. ते तान्हं बाळ पाठीशी होतंच. साहित्य परिषदेसमोरच्या बिल्डिंगवर येऊन पोहोचल्यावर त्यानं पाहिलं की अग्निशामकदलाचे लोक एक जाड कपडा ताणून धरून उभे आहेत. त्याने पाठीशी असलेलं बाळाचं गाठोडं सोडलं अन् त्याला त्या कपड्यात फेकलं. तान्हुल्याला जीवदान मिळालं.

पण तेवढ्यात पाण्याचा जोराचा लोंढा आला. अग्निशामक दलाचे लोकदेखील आता थोडे मागे हटले. आता आपण काय करायचं हे त्या तरुणाला कळलं नाही.

कुठलाही विचार न करता त्याने दुसऱ्या मजल्यावरून उडी टाकली.

तेवढ्यात पुनः पाण्याचा एक जोराचा लोट आला. त्याबरोबर तो तरुण एस्. पी. कॉलेजपर्यंत वाहत गेला. तो बेशुद्ध झाला होता. अग्निशामक दलाच्या लोकांनी त्याला उचलले. हॉस्पिटलमध्ये नेले.

त्याचा प्राण वाचला, पण....

पण त्याचे दोन्ही पाय जबरदस्त मार लागल्यानं लुळे पडले होते. त्या वर्षीचं शूर, साहसी मुलास देण्यात येणारं राष्ट्रपती पारितोषिकही त्याला बहाल करण्यात आलं.'

गोष्ट इथे संपेल. कुणी डोळे पुशीत तर कुणी आश्चर्यानं त्या तरुणाचं मनोमन कौतुक करतील.

कुणीतरी धिटाईत प्रश्न विचारील, 'तुम्ही म्हणता ही गोष्ट खरी आहे, तर मग त्या वेळचा तो तरुण आता कुठंय?'

मी हळूहळू खुर्ची मागे सरकवीत नेईन, अन् सांगेन तो तरुण मीच. तुम्हाला गोष्टी सांगणारा सुधाकर सोहोनी हाच तो तरुण.

माझ्या पांगुळगाड्यासारख्या खुर्चीकडे, माझ्या लुळ्या पायांकडे मुलं पाहतील. खुर्ची हातानं ढकलीत मी बाहेर पडेन. खुर्चीवर लिहिलेली पुढील अक्षरे मुलांना पाहायला मिळतील —

'अपंग वर्षानिमित्त राज्य सरकारकडून भेट.'

मित्रांनो, एका अपंग परंतु मनातील आवेश अभंग असलेल्या जिद्दी तरुणाची ही गोष्ट.

# ५ अबोली

‘ अनिकेत ’ बंगल्यातून सनईचे मंजुळ सूर ऐकायला येत होते. बंगला दिव्याच्या रंगीत माळांनी सुशोभित केला होता. बंगल्याबाहेर गाड्यांची रांग उभी होती. अप-टु-डेट पोषाखातील पुरुष व भारी अलंकार व वस्त्रांनी नटलेल्या स्त्रियांची गर्दी उडाली होती. सारखी धावपळ चालू होती.

आज श्रीमंत लालचंद शेटच्या मुलीचे बारसे होते. त्यासाठी ही गर्दी व धावपळ चालू होती.

भेटवस्तूंची देवाण-घेवाण, चिमुरड्या पोरांचा किलबिलाट अव्याहत सुरू होता. लालचंदच्या पत्नीचे नाव होते चमेली. म्हणून चमेलीबाईच्या मुलीचे नाव ठेवण्यात आले अबोली.

अबोली देखणी, सुंदर होती. नाव अबोली पण तिची बडबड अखंड चालू असायची. म्हणून तिचे पप्पा तिला लाडाने ‘ बडबडी ’ म्हणायचे. अबोलीने सगळ्यांना वेड लावले होते. अशीच आठ वर्षे गेली. अबोली आता चौथी इयत्तेत शिकत होती. वर्गात तिचा पाचच्या आत नंबर असायचा. त्यामुळे ही हुशार पोर आईची विशेष लाडकी होती. शाळा सुटली अन अबोली घरी आली की प्रथम तिची धाव असायची किचन-रूमकडे. मम्मीला बिलगत तिच्या कमरेला विळखा घालून झाला की किचनरूमवरील ओट्यावर चढून आईने ‘ खादी ’ ( खाणे )साठी काय ठेवलंय याकडे तिचे लक्ष असायचे.

असाच एक दिवस. दिव्याची अमावास्या होती. अबोली शाळेतून आली. अन् शिरस्त्याप्रमाणे ती किचनरूमकडे धावली पण समोरच दृष्य

पाहून तिने एक जोराची किंकाळी फोडली. तिने डोळे विस्फारले ते मिटेचनात.

काय बरं दिसलं तिला ?

तिला पाहायला मिळालं........

एक भयाण दृष्य........

तिची लाडकी मम्मी चक्कर येऊन बेशुध्द पडली होती. गॅस जळत होता. गॅसवरील कढईतले उकळते तेल तिचा लाडका टॉमी कुत्रा त्याच्या अंगावर पडले. कातडी सोलवटून निघाल्याने टॉमी बारीक आवाजात केविलवाणे ओरडत होता. पाय भाजल्याने त्याला पाऊल पुढे टाकवत नव्हते. ते भयाण दृष्य पाहून अबोलीने किंकाळी फोडली अन तिची वाचाच बंद झाली. तिला बोलताच येईना. अबोलीची किंकाळी ऐकून बागेतील माळी धावत आला. त्याने अबोलीला कोचावर बसवले. मालकीणबाईंना उठवण्याचा तो प्रयत्न करू लागला. अबोलीच्या पपांच्या ऑफिसात, फॅमिली डॉक्टरांना त्याने फोन केला. सगळे धावत आले. थोड्या वेळाने अबोलीची मम्मी शुध्दीवर आली.

पण अबोलीचं काय ?

ती बडबडी मुलगी नावाप्रमाणे खरोखरीच अबोली झाली—मुकी झाली.

अबोली मुकी झाली. तसं ‘ अनिकेत ’ बंगल्यातील चैतन्यच नाहीसे झाले. आपल्याला बोलता येत होते आणि आता येत नाही यामुळे अबोलीच्या जीवाची तडफड होई, तगमग होई. अतिशय कारुण्यपूर्ण नजरेने ती इकडे तिकडे पाहायची. ती दु:खी, नाराज दिसली की पप्पांचा चेहरा कष्टी व्हायचा. मम्मीच्या जीवाची उलघाल होत असे. काय

करावे कळेना. कारण खूप डॉक्टर, हकीम, वैद्य झाले. पण गुण येईना. अबोली फुलेना. जो जे सांगेल तो उपाय केला जायचा. अबोलीच्या पप्पांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला. पण सारे व्यर्थ.

एके दिवशी....अबोलीचे पप्पा कुठलसं मासिक वाचत होते. त्यातील एका बातमीने त्यांचे लक्ष वेधून घेतले. बातमी होती....

अमेरिकेचे प्रख्यात डॉक्टर आंल्वारिस याचे
मुंबईस आगमन. मुक्या बहिऱ्यावर इलाज
करण्याचे शिबिर

अबोलीचे पप्पा आनंदले. ते तावडतोब विमानाने मुंबईस निघाले. अबोली, तिचे पप्पा आणि मम्मी डॉ. अल्वारिस जिथे उतरले होते तिथे ते पोहोचले. डॉक्टरांनी अबोलीला तपासले अन विचारले.

'ही जन्मतःच मुकी आहे का ?' अबोलीच्या पप्पांनी नकारार्थी मान हलविली.

'मग ही मुकी कशी झाली?' डॉक्टरांचा प्रश्न.

'तिनं एक जबरदस्त अपघात पाहिला' असं म्हणून अबोलीच्या पप्पाने अपघाताची सगळी कहाणी सांगितली. डॉक्टरांनी पुनः तिची बारकाईने तपासणी केली. आशाळभूतपणे आपल्याकडे पाहाणाऱ्या अबोलीच्या मम्मी-पप्पांना डॉक्टर म्हणाले, 'यावर डॉक्टरी इलाज नाही'.

'मग ?' अबोलीचे पप्पा चिंतातूर स्वरात म्हणाले.

डॉक्टर बोलू लागले,

'गॉडच्या ( परमेश्वराच्या ) कृपेने तिला तेवढाच भयानक आपघात दिसेल तर तिची वाचा परत येईल, ती बोलू लागेल.'

डॉक्टरांचा निरोप घेऊन ती सर्व मंडळी दुसरे दिवशी गावी परतली. सर्वांची मने उदास होती. घरी येतात तर त्यांना पाहुणा भेटला. तो होता कुवेतहून आलेला. अबोलीचा मामा.

'हॅलो अबोली, कसं काय ?' मामाने प्रश्न केला, आणि अबोली मुकी आहे हे लक्षात येताच जीभ चावून तो गप्प झाला. अबोलीचा मामा कुवेतला सैन्यात नोकरी करत होता.

'काय म्हणताहेत डॉक्टर !' मामाने प्रश्न केला.

त्यावर पप्पांनी डॉक्टरांचे म्हणणे मामाला सांगितले.

'ठीक आहे, आता ईश्वरावर भरवसा. तथापि जगात कुठलीच गोष्ट अशक्य नाही ह्या न्यायानं काहीतरी चमत्कार घडेल व अबोलीला बोलता येईल असं मला वाटतं.' मामाने विश्वास प्रकट केला.

'तुझ्या तोंडात साखर पडो रे बाबा,' अबोलीची आई आपल्या भावाला म्हणाली.

काही दिवसानंतरची हकिकत.

त्या दिवशी अबोली व तिची मम्मी टेरेसवर ऊन खात बसले होते. मम्मीच्या हातात कसलंतरी लोकरीचं विणकाम होतं. मम्मीनं पाठवलेलं ते विणकाम पाहाण्यात अबोली दंग झाली होती. पाच मिनिटात मम्मीच्या हातातली लोकर संपली. मम्मीने लोकरीचा दुसरा नवा घेतला. त्याचं

एक टोक आपल्या हाती न दुसरे टोक अबोलीच्या हाती देऊन मम्मीने ती लोकर उलगडायला सुरुवात केली. अबोलीने सुटलेला लोकरीचा गुठ ( गोल ) करायचा होता. लोकर उलगडत मम्मी मागे सरकू लागली. अबोली त्या लोकरीचा गोल तयार करीत होती. मागे सरकत सरकत मम्मी टेरेसच्या अगदी टोकावर आली आणि अबोलीचे तिकडे लक्ष गेले. ती घाबरली अन मानेनेच खुणावून मम्मीला थांबायला सांगू लागली. मम्मीला काही कळले नाही. ती मागे जातच होती आणि मागे जात आहे हे लक्षात न आल्याने ममी टेरेसवरून कोसळली.

तोच—

'मम्मी, मम्मीऽ' असं किंचाळत अबोली उठली अन् धावत टेरेसच्या टोकावर आली. तोच कुठून तरी येऊन तिच्या मामाने अबोलीला थांबवले.

'मामा मामा, मम्मी पडली .... मम्मी पडली' म्हणत अबोली रडू लागली.

'कुठून पडली?' मामाने प्रश्न केला.

'हे काय, ह्या टेरेसवरून खाली' अबोलीने उत्तर दिले.

'तू काय करत होतीस?' मामाने पुनः विचारलं.

'मी ना—मी लोकर गुंडाळत होते....अरे पण हे काय! मामा, मी बोलू लागले. मला बोलता येऊ लागलं.' म्हणत अबोलीचा चेहरा हसरा झाला अन् लगेच रडव्या सुरात ती म्हणाली. 'पण मामा, मम्मी पडली.'

तोच तिला मम्मीचे शब्द ऐकू आले, 'मी कुठं पडल्येय, ही काय इथं उभी आहे.'

'मम्मी' म्हणत अबोलीने तिच्या कमरेला विळखा घातला. मम्मी मुद्दामच खाली पडली होती; परंतु तिला अलगदपणे झेलण्याची अगोदरच व्यवस्था झाली होती. हे सगळं अबोलीला कसला तरी धक्का बसावा व ती बोलू लागावी यासाठीच नाटक होतं.

आता अबोली पूर्वीप्रमाणे बडबडी झाली.

# ६ किशोर गंधर्वांचा अनोखा वाढदिवस



पुण्याच्या सांस्कृतिक इतिहासातील एक संस्मरणीय दिवस. वेळ. रात्रीची दहाची. रसिक पुणेकरांची टिळक स्मारक मंदिराकडे रीघ लागली होती. त्याला तसंच कारण होते. कारण होते एका अभूतपूर्व संगीत मैफिलीचे.

आज फार दिवसांनी ख्यातनाम गायक किशोरगंधर्व गाणार होते. आजच्या कार्यक्रमाचे सगळे उत्पन्न अंधशाळेच्या मदतीला दिले जाणार होते. तेव्हा तिकिटाचे दर अधिक असूनदेखील नाट्यगृह ओव्हरफुल झाले होते. प्रवेशद्वार बंद करण्यासाठी रखवालदार लोखंडी दरवाजाजवळ आला. तोच जमलेल्या मात्र तिकिट न मिळालेल्या श्रोत्यांनी आरडा-ओरडा सुरू केला.

‘ आम्हाला गाणं ऐकू द्या. ’

‘ आम्ही बाहेर थांबू पण गाणं ऐकायला मिळालं पाहिजे. ’

रसिकांची ती वाढती मागणी ऐकून व्यवस्थापक काय करावे, काय करू नये ह्या संभ्रमात क्षणभर पडले. मनाशी काही निर्णय करून व्यवस्थापकांनी संगीत-चूडामणी किशोरगंधर्व यांच्याकडे धाव घेतली. दोघांनी विचारविनिमय केला.

किशोरगंधर्व बोलले, ‘ रसिक हे आमचे मायबाप—अन्नदाते, त्यांना नाराज करू नका. ’

झालं, व्यवस्थापकांनी भराभर दोन—चार ठिकाणी फोन केले. कुणाकुणाला सूचना करण्यात आल्या. आणि आवारात ठिकठिकाणी मिळून चार—सहा लाऊडस्पीकर बसवण्यात आले. सर्वांनी मनोमन कृतज्ञता व्यक्त करीत जाहीरपणे आनंदाचा जल्लोष केला. आता रात्रीचे साडेदहा वाजले.

तंबोरे जुळवण्यात आले. तबला, डग्गा पाहिजे त्याप्रमाणे लावण्यात आला होता. किशोरगंधर्वांनी सुरुवात केली.

सा ऽ ऽ ! श्रवणमधुर रागातलं कुठलेसे गाणे सुरू झाले. एवढा वेळ चाललेला कलकलाट क्षणात बंद झाला. सर्वांचे कान गंधर्वांच्या गाण्या-कडे लागले. जसजसा वेळ जाऊ लागला, तसतसे श्रोते तल्लीन होऊ

लागले. माना डोलवू लागले. ह्या आनंदात रात्रीचे साडेअकरा कधी वाजले हे कुणाला कळलेच नाही.

गंधर्वांनी गाणे थांबवले. मखमली पडदा पडण्यापूर्वीच कार्यक्रमाचे संयोजक रंगमंचावर आले. अन् बोलू लागले,

'रसिकहो, आजचा हा संगीताच्या दुनियेतील एक आगळा कार्यक्रम आहे. कलेच्या प्रांतात त्याची दखल घेतली जाईल. पण इतिहास त्याची नोंद घेणार आहे ते वेगळ्याच कारणास्तव. ते कारण सांगण्यासाठी मी उभा आहे.

मित्रहो, किशोर गंधर्वांच्या जीवनातील एक अतिशय महत्त्वाचा प्रसंग घडून गेला त्यांच्या बालपणी. किशोर त्यावेळी आठ-दहा वर्षांचे होते. जन्मदात्री आई जन्म देऊन देवाघरी गेलेली अन् त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षी वडलांनी ह्या जगाचा निरोप घेतलेला. मात्र किशोर बालवयातच सुरेल आवाजात गाऊ लागले होते. विजेच्या चपळाईने त्यांची बोटे पेटीवरून फिरत होती. गावातील प्रसिध्द रसिक, संगीताचे जाणकार, आबासाहेब नेहमी म्हणत, 'पोरगा कुणी साधासुधा नसून स्वर्गातील प्रत्यक्ष गंधर्वानेच जन्म घेतला आहे. ह्याला कुणी चांगला गुरू भेटेल तर हा केवळ भारतातच नव्हे, तर अलम दुनियेत नाव काढेल.'

आबासाहेबांचे ते बोलणे किशोरच्या बहिणीच्या कुसुमच्या – कानावर येई. आबासाहेब घरी आले की कुसुमला त्याबद्दल सुचवीत. कुसुमताई त्या वेळी साध्या शिक्षिका होत्या. तेदेखील एका खाजगी मराठी शाळेत. तेव्हा त्यांना किती पैसे मिळत असतील ह्याची तुम्हीच कल्पना करा.

एके दिवशी मनाचा हिय्या करून कुसुमताईने किशोरला ग्वाल्हेरला नेले. तेथील विख्यात खाँसाहेब महमद हसनखाँ यांच्या घरी ही दोघे

भावंडे गेली. भेदरलेल्या चिमण्याप्रमाणे दोघे जीव मुठीत घेऊन संकोचाने बसली होती. कारण खाँसाहेबांचा रियाज चालू होता. रियाज संपला. खाँसाहेबांनी दोघांकडे पाहिले. खानदानी आदब व्यक्त करीत त्यांनी विचारलं,

' फर्माईये, कैसे आना हुआ ? '

' ह्या मुलाला आपला शागीर्द म्हणून आपण स्वीकारावा अशी इच्छा आहे. ' कुसुम म्हणाली.

' अच्छा ! बच्चे, गाने की तबियत हो तो कोई गाना सुनाओगे ?' खाँसाहेबांनी इच्छा प्रदर्शित केली. मोठ्या आत्मविश्वासाने किशोर पुढे सरकला.

' बेटे, इधर आओ ' म्हणत खाँसाहेबानी आपल्या जवळ बसवून घेतले.

किशोर गाऊ लागला. भान हरपलेल्या अवस्थेत खाँसाहेब उठले व डोळे मिटून मान डोलावणारे खाँसाहेब गण्प झाले. खाँसाहेबांना गाणे आवडले किंवा नाही हे कुसुमला कळेना. ती अवाक होऊन पाहात राहिली. दोन-पाच क्षणानंतर खाँसाहेबांनी डोळ्यातील आनंदाश्रू पुसले अन् किशोरला पसंतीची पावती देण्यासाठी जणू कुर्निसात करीत म्हटले, ' बहोत खूब, बहोत अच्छे, खुदाकी देन है बेटे तुझे. ' म्हणत मोठ्या ममतेने त्यांनी त्याच्या पाठीवरून हात फिरवला अन् कुसुमला म्हटले,

' बहेन, ह्याला आपण जरूर शागीर्द करू. पण ह्याला इथं बारा वर्षं राहावं लागेल. '

' काही हरकत नाही. ' कुसुमने होकार दिला. पण गप्पाच्या ओघात किशोरला ग्वाल्हेरला राहाण्यासाठी बारा वर्षासाठी पन्नास हजार रुपये लागतील हे कळल्यावर ती सर्दच झाली. काय बोलावे हे तिला कळेना.

पन्नास हजार कसे जमवायचे या विचारचक्रात अडकलेल्या कुसुमताईंना काही सुचेना. त्या सुन्न होऊन सतत चिंतेत असल्यासारख्या दिसत.

एके दिवशी कुठल्याशा वृत्तपत्रात त्यांना बातमी वाचायला मिळाली.

'उद्योगपती धनसुखलाल ह्यांना
दृष्टी देणारास एक लाख'

बंगलोरचे धनाढ्य धनसुखलाल अपघातात सापडल्याने अंध झाले होते. आपल्या डोळ्याचे दान करणाराला ते एक लाख रुपये देणार होते. कुसुमताईंनी कसलाही विचार न करता आपले डोळे दान करून किशोरला खाँसाहेबाकडे पाठवले. गेली चाळीस वर्षे त्या दृष्टीहीन आयुष्य जगताहेत, केवळ आपल्या भावासाठी. किशोर गंधर्वांचं अभूतपूर्व यश, त्यांना जागतिक कीर्ती मिळाली, ह्या सर्वांचे फार मोठे श्रेय कुसुमताईंना दिले पाहिजे. किशोरांच्या बोलण्यातून ते सतत प्रकट होत असते.

रसिकहो, आता रात्रीचे ठीक बारा वाजले आहेत. किशोरांचा वाढदिवस. आज किशोर गंधर्व आपल्या बहिणीला ह्यानिमित्त आगळी भेट देणार आहेत. आता कुसुमताई उपस्थित आहेत. त्यांच्या दोन्ही बाजूंना भारतातील ख्यातनाम नेत्रविशारद बसले आहेत. काही दिवसा-पूर्वीच कुसुमताईंच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. नेत्रपेटी-कडून मिळालेल्या डोळ्यांमुळे त्यांना दृष्टीलाभ घडणार आहे. दृष्टी येताच आपल्या भावाला – किशोर गंधर्वांना डोळे भरून पाहाण्याची त्यांची इच्छा आहे आणि आपल्या बहिणीला अभूतपूर्व गायनाची भेट त्यांचे बंधू किशोर गंधर्व देतील.

निवेदकाचे निवेदन संपले. सगळ्यांच्या नजरा पहिल्या रांगेतील कुसुमताईकडे लागल्या. प्रेक्षक खुर्चीतून उठून उभे राहिले. प्रेक्षकांचे मन

किशोर गंधर्वांनी ओळखले. त्यांनी ‘ ताई चल ’ म्हणून कुसुमताईचा हात धरला. त्यांना रंगमंचावर आणले. प्रेक्षकांनी त्या त्यागी बहिणीच्या स्वागतासाठी टाळ्यांचा कडकडाट केला. किशोरनी त्यांना वाकून नमस्कार केला. कुसुमताई प्रेक्षकांना अभिवादन करून पुन: पहिल्या रांगेत येऊन बसल्या. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार प्रेक्षागृहातील एक एक दिवा मालवण्यात आला. छतातून मंद पिवळ्या प्रकाराचे दिवे तेवढे चालू ठेवण्यात आले. रंगमंचावरील सगळे दिवे मालवले गेले. किशोर गंधर्वांच्या प्रसन्न तेजस्वी मुखावर फक्त थोडा प्रकाश ठेवण्यात आला. डॉक्टरांनी कुसुमताईच्या डोळ्यावरील पांढरी पट्टी हळूहळू सोडली आणि .... डोळ्यांची उघडझाप करीत कुसुमताई पाहू लागल्या. प्रथम धूसर प्रकाश .... नंतर अस्पष्ट चित्र .... हळू हळू किशोरची मूर्ती त्यांच्या डोळ्यापुढे पूर्णतया साकार झाली.

‘ भाऊ ’ अशी हाक त्यांनी हाक मारली.

‘ ताई ’ असं आनंदानं म्हणत अन् एकवार ताईला, नंतर प्रेक्षकांना हात जोडून किशोर गाऊ लागले. अत्यानंदाने धुंद झालेल्या त्यांच्या मुखातून जणू गानदेवताच प्रकट होत होती. पहाटे भूप रागातील चीज तर विशेष गायिली. श्रोते भान हरपले होते. सर्व नियम बाजूला ठेवून त्या रात्री कार्यक्रम चालू ठेवला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली, किशोर गंधर्वांची ती अनोखी भेट पाहण्यास व ऐकण्यास हजारो श्रोते साक्षीस होते. पटांगणात अंध शाळेच्या मदतीसाठी ठेवलेल्या पेट्यातून काही हजार रुपये जमले.

# ७ मदर का रडली ?

अपंग कल्याणकारी संस्थेचे ' आधार ' वसतिगृह. आज तेथील प्रत्येक वस्तूत उत्साह भरून होता. अपंग वर्षाचा सांगता-समारंभ. सगळीकडे कागदाच्या, फुलांच्या माळांनी सुशोभन केले होते. प्रवेशद्वारासमोर रंगीत रांगोळीचा गालिचा रेखाटला होता. आजच्या सोहळ्याला कुणी बडे पाहुणे येणार होते.

तिथल्या मुलामध्ये मात्र वेगळ्याच कारणाने चैतन्य फुलून आले होते. उमलत्या फुलाप्रमाणे प्रफुल्लित मनाने ती बालचमू मदर डिसूझाला काही महिन्यानंतर भेटणार होती. कारण डिसूझा गेले चार महिने रजेवर होत्या. नुसत्या रजेवरच नाही तर परगावी गेल्या होत्या.

सकाळचे आठ वाजले. कार्यकर्ते, संस्थेच्या सेविका दाराजवळ पाहुण्यांचं स्वागत करायला हजर झाल्या. पाहातात तो तेथे मदर हजर. त्यांना पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले.

' पहाटे चार वाजता ' असं मदरने उत्तर द्यावं. असं चार-दोन वेळी घडलं. तेवढ्यात पाहुण्यांची गाडी आली. सगळ्यांची धावपळ उडाली. बॅण्ड वाजू लागला. मुलांनी काठ्यांची कमान केली. स्वागत गीत झाले. आणि....

मैदानात अपंगाच्या विविध स्पर्धा सुरू झाल्या. मदरला स्टेजवर पाहून तर मुलांचा उत्साह शतगुणित झाला.

अपंगांच्या तीन चाकी-सायकल स्पर्धा, रमेश रणदिवे पहिला आला. गाण्याची मैफल, अंध कालिका भोळेने गाजविली.

कुबड्यांच्या आधारे शंभर मीटर चालणे-शर्यत, कुंदा महाजनने जिंकली.

बक्षीस-समारंभ सुरू झाला. पाहुण्यांनी सर्वांना बक्षीसे वाटली. छोट्या मुलांना खाऊ व फुगे देण्यात आले. भाषण व चहापानानंतर पाहुण्यांच्या गाड्या निघाल्या. गाड्यांनी उडवलेली धूळ तिथल्या फलकावर उडाली.

पाहुणे निघून गेले तशी सगळी मुले मदर डिसूझाकडे धावली. 'नमस्ते मदर, नमस्ते मदर' असा किलबिलाट झाला.

'मदर, पाहिलंत मला ही नवी कुबडी मिळाली.' चिमुरड्या बाळूने म्हटले.

'अरे वा, म्हणजे आमचा बाळकृष्ण आता जोरात धावणार.' असं म्हणणाऱ्या मदरचे लक्ष तेवढ्यात अबोली आंबेकरकडे गेली. तिला जवळ घेत मदर म्हणाल्या, 'किती ग वाळलीस तू?' त्यावर लाघवी शब्दात अबोली म्हणाली, 'मदर, तुम्ही नव्हता ना, म्हणून.' 'हो ग माझ्या बाळे. पण मोठी लबाड आहेस तू. तुझ्या अशा बोलण्यामुळंच मुली तुला माझा चमचा म्हणून चिडवतात.' 'म्हणू देत. मला नाही काही वाटत त्याचं.' अबोली फणकाऱ्याने म्हणाली.

'बरं बरं, चला. जेवायची वेळ होईल एवढयात.' असं बाईंनी म्हणायला अन् जेवणाची वेळ झाल्याची सूचना देणारी घंटा व्हायला एकच गाठ पडली. आपल्या त्या सगळ्या 'चिमण्यांना' सोबत घेऊन मदर जेवणाच्या हॉलमध्ये आल्या. ताटं-वाट्या आल्या. सगळ्यांना वाटले. सर्वजण एका सूरात म्हणू लागले —

'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे' तोच 'तार' म्हणत पोस्टमन तेथे आला. कुणी सेवकाने तार मदरच्या हातात दिली. तारेत मजकूर होता.

'अपंग मित्र' ही पदवी व एक लाख रुपयांचे पारितोषिक
मदरला देण्याचे जाहीर करण्यात येत आहे.

मदरचे डोळे पाणावले. तारेचा कागद बाजूला ठेवून त्या सगळ्यांना म्हणाल्या, 'चला, करा सुरुवात जेवायला.' तो दिवस सगळ्यांना आनंदात गेला.

रात्री दहा वाजता सगळी मुलं झोपी गेली. चार महिन्यानंतर मदर सगळ्यांना डोळे भरून पाहाण्यासाठी निघाल्या. कुणाचा रग नीट करीत, कुणाचा कॉटखाली लोंबणारा पाय कॉटवर ठेवीत, कुणाच्या कपाळावरील बटा मागे करीत, कुणाच्या कुबड्या नीट ठेवून, त्या येऊ पाहाणारे रडू आवरीत आपल्या खोलीत गेल्या. आता त्यांना रडू आवरेना. त्यांचा तो आवाज ऐकून अबोली जागी झाली. मदरच्या खोलीत जाऊन त्या म्हणू लागल्या, 'पोरी, मी चार महिने दूर का राहिले म्हणालीस मघाशी. अग हे अपंग वर्ष सुरू झालं. आठ महिने निरनिराळ्या संस्थांकडून मदतीचा पूर येऊ लागला. वाटलं, आता काही महिने दूर जायला हरकत नाही. पण आता हे वर्ष संपणार. आता लोकांची सहानुभूती दुसरीकडे. माझ्यासारख्या म्हाताऱ्याकडं वळणार असं ऐकलं, वाचलं. मग मी मनाशी म्हणाले, 'आता खरी माझ्या पोरांना पुनः माझी गरज आहे' म्हणून मग धावत आले. आपल्या घरी आले. पोरी, आता कध्धी तुम्हाला सोडून जाणार नाही. ते लाख रुपये तुमच्यासाठीच घ्यायचं ठरवलंय मी.'

'अगदी शप्पथ, कधी जाणार नाही?' म्हणत अबोलीने मदरचे हात आपल्या गळ्याशी घेतले.

'पोरी, गॉडचं बोलवणं येईपर्यंत कध्धी जाणार नाही. प्रॉमिस देते तुला.' म्हणत मदर रडू लागली.

अपंग वर्षाच्या सांगतेचा हा खराखुरा सोहळा देव आभाळातून पाहात होता.

'बंड्या, आहेस का घरात ?' अशी एका पाठोपाठ, शंख केल्याप्रमाणे गुंड्याची हाक कानी आली. कॉटवरून ताडकन उठत खिडकीतून गुंड्या उत्तरला,

'आहे, अजून तरी जिवंत आहे. अन् हे काय, बरोबर वानरसेना आणलेली दिसतेय.'

'हो. सुहास, चंदू, सविता, राजू आणि अस्मादिक. एकूण हम पाँच!' गुंड्याच्या ह्या बोलण्यावर दार उघडीत बंडू म्हणाला,

'बेटा, मग खालूनच काय कोकलतोस. वर घेऊन ये की सगळ्यांना'- फटाफट बेफिकिरपणे चपला फेकीत ती पलटण आत येते.

'काय रे, आज सकाळी सकाळीच! गृहपाठाची वही हवीय का?' बंडूचे ते कुत्सितपणाचे बोलणे ऐकून राजू फणकाऱ्याने बोलला, 'अहो स्कॉलर, नका गमजा करू. तुमच्यासारखे छपन्न आय ए एस पाहिलेत.'

'मिस्टर राजू, आय ए एसची परीक्षा बंद होऊन काही वर्षे झाली-यत. कृपया नोंद घ्या.' बंडूचे उपहासाचे बोलणे ऐकून चरफडत राजू म्हणाला, 'बरं बरं समजलं.'

'अरे, तुम्ही असे भांडता काय?' सविता दोघांची समजूत काढीत बोलू लागली, 'आपण आलो आहोत कशाला अन् तुमचं हे चाललंय काय?' तेव्हा सुहास गंभीरपणे सांगू लागला, 'बंड्या, आम्ही एक प्लॅन घेऊन आलो आहोत.'

'प्लॅन! कसला प्लॅन?'

'आपण आपल्या 'धडपड्या बालमंडळा'चं नाटक बसवायचं—नाटक!'

'आयडियेची कल्पना वाईट नाही, पण आजच ही सुरसुरी कशी आली म्हणतो मी. कोई खास वजह!' बंड्याने नाटकीपणे विचारल्यावर गुंड्या बोलण्याचा तोच धागा पकडून कमरेत वाकून बादशहाला कुर्निसात करण्याच्या आविर्भावात म्हणाला, 'राजे, मोठमोठाली मंडळी आपल्यासाठी नाटक लिहून राहिली आहेत. आता तर म्हणे त्याबद्दलची शिबिरं घेताहेत. पण....?'

'आम्हाला काय हवंय?' सविता .

'मुलांना काय नको आहे?' चंदू.

'आम्ही कशाचे भुकेले आहोत?' गुंडू.

'कुणी ह्याचा गंभीरपणे विचार केला आहे का?' सुहास.

तेव्हा बंड्या कॉटवर उभं राहून बोलू लागला, 'धडपड बालमंडळाच्या सभासदांनो, तुम्ही एवढे हवालदील होण्याचं काहीच कारण नाही. आशय, विषय, भाषा ह्या दृष्टीनं मुलांसाठी असलेले, मुलांनी सादर केलेले नाटक, ते बालनाट्य असं तो शरदमुनी सांगून गेलाय.'

उजव्या हाताची मूठ उंचावीत सविता ओरडली, 'झूट, साफ झूट.'

'कशावरून ग हे खोटं?' बंड्याने प्रश्न केला. तेव्हा एखादं रहस्य सांगावं अशा पद्धतीने सविता सांगू लागली, 'अरे, मागे एकदा आमच्या कॉलनीतली मुलं देशपांडे काकांकडे गेली होती.'

'कोण ग हे देशपांडेकाका?' बंडू.

'अरे, ते नाही का नाटकं लिहितात.'

'हं हं. पु. ल. देशपांडे. बरं त्यांचं काय?' गुंडू.

'मुलांनी त्यांना प्रश्न केला, 'काका! काका! तुम्ही मोठ्यांसाठी एवढी नाटकं लिहिलीत. पण आम्हा मुलांसाठी एकही नाही.'

'मग काय म्हणाले ते?' सुहास.

'तेव्हा त्यांचा तो टीपिकल ओशाळल्यासारखा चेहरा करीत ते म्हणाले, 'मुलांसाठी नाटक लिहायचं म्हणजे....?' तेव्हा त्यातील एक इब्लिस पोरटा म्हणाला, 'हुड्त. मग तुम्ही कसले लेखक?''

'अच्छा, पुढं काय झालं?' चंदू.

'पुढं काय व्हायचंय. ती फिरकी बरोबर लागू पडली अन् त्यांनी एक झक्कास असं 'वयं मोठं खोटं' नाटक लिहून आपणा पोरांची चांगलीच 'फ' केली.' त्यावर सगळेच हसले. मग बंडू म्हणाला, 'पण त्याचा इथं काय संबंध?'

'वत्सा, तेच मी तुला समजावून सांगत होतो. त्या नाटकात मोठी-देखील माणसे कामं करतात, तेव्हा केवळ मुलांनीच कामे केली पाहिजेत असं नाही.' त्यावर तिला वेडावीत बंडू बोलला,

'काकूबाई, तुमचा मुद्दा पटला. पण मघाशी आम्हाला काय हवंय, काय नकोय म्हणाला त्याचं काय?' त्यावर एकएक बोलू लागला.

'आमची परीक्षेबद्दल काही तक्रार आहे.'

'ऑफिसात जाणाऱ्या आईबद्दल मला काही सांगायचंय.'

'आमच्या समोर झोपडीत राहाणाऱ्या 'झिपऱ्या'ला तर नेहमीच खूप काही सांगायचं असतं. मोठ्यांना काही ऐकवायचं आहे.'

'आम्हाला कंटाळा आलाय पऱ्यांच्या अन् पुराणातल्या नाटकांचा.'

'अरे, मग हवंय तरी काय तुम्हाला?' असा प्रश्न विचारीत बंडूचे बाबा व काका आतल्या खोलीतून येतात. त्यांच्या अचानक येण्यामुळे सगळी मुले थोडी घाबरतात. तेव्हा बाबा म्हणतात, 'मुळीच संकोच बाळगू नका. मोकळेपणानं बोला. आम्हाला बिलकूल राग यायचा नाही.'

'आम्हाला हवंय ढिश्यांऽऽव ढिश्यांऽऽव.'

'बस्स !' बाबांच्या ह्या प्रश्नावर मुले एकमेकांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहातात.

बंडू म्हणतो, 'आम्हाला नेहमी नवं नवं हवं असतं.'

'ठीक आहे. तूर्त आज आपण ढिश्यांऽव ढिश्यांवचं नाटक करू. मोठ्यांच्या कुठल्याही नाटकात रामा गडी असतो. मी होतो रामा गडी !' तेव्हा सगळे किंचाळतात, 'काय ! तुम्ही रामा गडी ?'

'येस, रामा गडी. धोतर, बनियन, अंगावर नॅपकीन, हातात फडकं घेऊन हा मी आलो. तोपर्यंत तुम्ही काही ठरवा आणि लेटस स्टार्ट !' म्हणत बाबासाहेब निघून जातात.

'मी जातो रे' म्हणत काका निघून जातात.

'बंड्या, आता रे काय करायचं ?' चंदू.

'अरे, बघू जमेल ते. हिम्मत सोडायची नाही.'

'ए बंड्या, आपण त्या 'वयं मोठं खोटं' प्रमाणे छोटे–मोठे होऊ या.'

'चंदूची चांगली आयडिया आहे. लागा कामाला. खडूच्या पेटीनं मिश्या रंगवा. ताईची साडी, आजोबांचं जाकीट, बाबांचा चष्मा घ्या' बंडू अशा सूचना करत सर्वांना योग्य ते साहित्य देतो. धावपळ, बडबड करीत 'माझ्या मिशा', 'माझी साडी', 'हा तर फुटलेला चष्मा' म्हणत थोडे भांडण करीत सगळेजण जसा जमेल तसा मेकअप करतात. बाबासाहेब गड्याच्या वेषात बाहेर येतात. सगळेजण त्यांच्याकडे आश्चर्याने पाहात असतात. आणि....

दारावरची बेल वाजते....डिंग डाँग. बाबासाहेब सर्वांना खुणावत सावध राहायला सांगतात. प्रत्येकजण आता आई, बाबा, मामा झालेले असतात. रामा उर्फ बाबा दार उघडतात. पेपरवाला पेपरचे बिल देऊ लागतो,

तेव्हा रामा त्या पोऱ्याला ' बिल साहेबास्नी द्या ' म्हणत बंडूकडे बोट दाखवतो.

' हो हो, आणा. ' म्हणत बंड्या ते बिल ऐटीत घेतो. पेपरवाला पोरगा जातो.

' बाबा, आपलं नाटक छान होणार ' म्हणत सगळी मुले आनंदाने उड्या मारतात. तोच पुनः बेल वाजते. रामा सगळ्यांना सावरून बसायला सांगतो. सविता उर्फ आई पेपर वाचू लागते. बाकीचे आपसात गप्पा करू लागतात. रामा दार उघडतो. तोच डोळ्यावर पट्टी, अंगात चट्टयापट्टयांचा बनियन, पाठीवर गाठोडे, हातात पिस्तूल अशा वेषात कुणी चोर प्रवेश करतो. अन् सर्वांना दरडावीत म्हणतो,

' खबरदार, जर कुणी जागचे हालाल तर. ' सगळ्यांचा थरकाप झाला आहे. सविता रडू लागते. चोर ओरडतो,

' ए थेरडे, गप्प बस....सांग तिजोरीच्या किल्ल्या कुठं आहेत ? '

' बाबाऽऽ ' चंदू ओरडतो व रामाकडे पाहतो. तेव्हा रामा म्हणतो,

' बाबा नाही रामा. पोरगा माज्यापरमाणं खुळचट हाय. '

' बाईसाहेब, त्या किल्ल्या दिवाणाच्या गादीखाली हैती ' म्हणत रामा दिवाणाकडे जाऊ लागतो. तोच तो चोर झडप घालून किल्ल्या हस्तगत करतो व मोठमोठ्याने राक्षसासारखा हसतो. तोच फोनची घंटा वाजते. रामा फोन घेतो. चोर त्याच्या कपाळाला पिस्तूल लावतो. राम म्हणतो,

' हॅलव. मी रामा. कोण सदा ? काय रं. कोकणातून कवा आला असा ' फोनवर हात ठेवीत चोराला म्हणतो, ' माझा गावाकडचा मैतुर हाय ' व फोनवर बोलतो,

' चोरा, मला नाही सांगितला. पोलिस घेऊन येतो ? ये. तवाच चोर घावल, लवकर ' म्हणत फोन बंद करतो. चोराकडे वळून म्हणतो,

' तिकडच्या बंगल्यात दिकून चोरी झाली. सदा पोलिस आणायला चाललाय, मला बलवीत होता. मी नाय म्हटला. '

मुले तोंड दाबून रडत असतात. रामा म्हणतो, ' बाबासाहेब, हुईल सगळी नीट. आता रडून काय उपेग ? बाईसाब उगी. '

तोच पुन: बेल वाजते आणि डॉ. सदाशिवराव जोशी पोलिसासह येतात. चोर गडबडतो. सदाशिवराव म्हणतो, ' पकडा ह्या हरामखोराला. बाबासाहेब तुमचा आवाज मी ओळखला. म्हटलं काही तरी गडबड आहे. तेव्हा पोलिसांना घेऊन आलो. '

' अगदी बरोबर केलंत तुम्ही ' रामा उर्फ बाबासाहेब म्हणतात. ' पण अहो हा खरा चोर नाही ' तेव्हा मुले आश्चर्याने म्हणतात, ' मग कोण आहेत हे ? '

तेव्हा आपल्या डोळ्यावरची पट्टी काढत चोर म्हणतो, ' मी तुमचा काका. तुमच्या नाटकात सहभागी झालेला ' मुले काका, बाबांना मिठी मारतात. तेव्हा पोलिस विचारतो,

' बाबासाहेब काय भानगड आहे ही ? '

' अहो ही भानगड नाही. हे आहे नाटक. काय ते तुम्हाला सांगतो. पण अगोदर चहा घेऊ या ' असं बाबासाहेब म्हणतात. मुले आपसात ' आपण कसे फसलो ' याची चर्चा करतात अन् इथं संपते मुलांच्या नाटकाची गोष्ट.

# १ तुकाराम सिकाराम

जून उजाडला. शाळा सुरू झाल्या. दरवर्षी कुठल्या तरी अफवेनं जन्म घ्यावा ह्या न्यायानं 'पुण्यात मुलं पळवणाऱ्या टोळीचा धुडगूस' ह्या अफवेनं यंदा घबराटीचं वातावरण निर्माण केलं.

अशाच एका सायंकाळी शाळा सुटली. अभिजित आणि चंदू दप्तर काखेत अडकवून घराकडे निघाले. अभिजित पेढे अन् चंदू गाडगीळ दोघेही धनिकांची मुले. तेव्हा त्यांच्या बोलण्याचा झोक ऐटबाज असायचा. त्या दिवशी मात्र त्याच्या बोलण्याची गाडी वेगळ्याच वळणाने चालली होती. चंदू म्हणाला, 'अरे सुहास, आजचा पेपर पाहिलास का? त्या मॉडेल हायस्कूलमधील तीन मुले म्हणे गायब आहेत. गेले चार दिवस पत्ता नाही त्यांचा.'

'अरे गेले असतील तेच कुठं तरी भटकायला. काही तरी थ्रिल करून दाखवण्याची फॅशन झालीय आजकाल.'

'नाही रे, मला तर दुसरीच भीती वाटते.' चंदू चाचरत बोलला.

'कसली? मुलं पळवणाऱ्या टोळीची? हुड्डूत्, भितरट कुठला? अरे त्यात भिण्यासारखं काय आहे. समजा, उद्या आपल्याला पळवून नेलं तरी डरायचं नाही. हिम्मत ठेव. अन् हे बघ, अशा वेळी आपण दोघे एकत्र असलो तर आपल्या 'च'च्या भाषेत बोलायचं. मान्य?' अभिजितच्या या सूचनेवर चंदूने मान डोलावली. तोच समोरून कसली तरी पालखी गेली. वारकरी 'ज्ञानबा तुकाराम'चा टाळांच्या तालात गजर करीत होते.

तेवढ्यात एक फियाट गाडी चंदूजवळ येऊन थांबली. गाडीतल्या माणसाने बाहेर डोकावीत विचारलं, 'बाळ, नेहरू स्टेडियम कुठं आहे.'

चंदू त्या इसमाला माहिती सांगू लागला. तोच चंदूला मध्येच अडवीत तो माणूस म्हणाला,

‘ तसं कशाला, तू जरा गाडीत ये अन् दाखव. हवं तर पुन्हा तुझ्या घरी सोडीन. ’

‘ हा माझा मित्र आहे सोबत. ’ चंदू बोलला.

‘ त्याला देखील घे. ’ असं बोलणं झाल्यावर चंदू अन् अभिजित गाडीत बसले. तोच गाडीतल्या लोकांनी त्यांच्या तोंडात बोळा कोंबला आणि गाडी नेहरू स्टेडियमऐवजी कात्रज घाटाकडे निघाली. आपण मुलं पळवणाऱ्या टोळीच्या तावडीत सापडलो हे अभिजितने ओळखले. त्याने चंदूला डोळ्यानं खुणावून गप्प राहाण्यास सांगितले. कुठल्या तरी आडरानातल्या एका बंगल्यात त्या दोघांना नेण्यात आले. दोघांना खुर्चीत बसविल्यानंतर गळ्याभोवती रुमाल गुंडाळलेल्या एका इसमाने अभिजितला विचारले, ‘ तुझं नाव काय ? ’

‘ तुकाराम ’ अभिजितनं बंडल फेकली व पुढे पुस्ती जोडत तो म्हणाला,

‘ अन् माझा हा मित्र मिकाराम. तो आहे कानडी. त्याला मराठी बोलता येत नाही, कळत नाही. ’ चंदूला अभिजितचा डाव कळला तो म्हणाला, ‘ चयहो चयहो ’ ( होय, होय ).

‘ चयहो हा कानडी शब्द. त्याचा अर्थ होय. ’ अभिजित ऊर्फ तुकारामने खुलासा केला.

त्या गुंडांनी मग तुकारामला ( अभिजित ) पेठेची घरची ;सगळी माहिती, पत्ता, फोननंबर विचारला. तुकारामने ( अभिजितने ) खरी माहिती दिली. तेव्हा त्या टोळीचा प्रमुख म्हणाला,

‘ आत्ताच तुझ्या बापाला फोन करून दहा हजार रुपये घेऊन

लकडी पुलावर यायला सांगतो. मात्र लक्षात ठेव. त्यांनी जर का पोलिसांना कळवलं तर तू मेलाच म्हणून समज.' असा दम भरून अन् दोघांना पहाऱ्यावर ठेवून ते गुंड बाहेर पडले.

'तुकाराम, चलाम चकभू चागलीय' मिकाराम म्हणाला. तेव्हा तुकाराम त्या गुंडांना म्हणाला, 'माझा मित्र भूक लागली म्हणतोय,' त्यावर खदाखदा हसत तो गुंड बोलला, अरे वा ही कानडी भाषा चटपटीत अन् चांगली दिसतेय. सांग तुझ्या त्या कानड्याला भूकबीक काही नाही म्हणावं, राजाचा बेटाच की नाही तो.'

असाच थोडा वेळ गेला. तेव्हा मिकाराम पुन्हा म्हणाला, 'चलाम चथरूमबा चायचंयजा' गुंड तुकारामला दरडावून म्हणाला, 'काय मचमच लावलीय ह्या पोरानं. काय बडबडतोय तो.' 'त्याला बाथरूमला जायचंय.' तुकारामने खुलासा केला. ढग गडगडावेत तसा एक गुंड म्हणाला, 'अरे, इथं राजमहाल हाय का. जा म्हणावं त्याला बाहेर मोकळ्या पटांगणात.' तुकाराम बोलला, 'चतू चळूनप चजा. (तू पळून जा).'

मिकाराम बाहेर गेला. बाहेर पडताच त्याने जी धूम ठोकली ती घराच्या दिशेनेच. बराच वेळ झाला तरी मिकाराम परत आला नाही हे पाहून गुंड ओरडला, .... 'कार्टं पळून गेलं की काय?'

'मरू दे. नाहीतरी त्या कन्नडचा ठावठिकाणा लागणं अन् त्याच्या बापाला कापणं अवघड गेलं असतं.' दुसरा गुंड बोलला.

त्या रात्री दहा वाजता ब्रीफकेस हातात घेऊन सगळे गुंड तुकाराम होता तिथे आले. सगळ्यांनी आरडाओरडा, जल्लोष सुरू केला. टोळीचा प्रमुख म्हणाला, 'तुकाराम तुझा बाप मोठा समजूतदार हं. मुकाटपणे पैसे आणून दिले. पोलिसांना कळवलंदेखील नाही.'

'साहेब, तुकारामला सोडायचं का?'

'गधड्या, अरे तुकाराम हा सोन्याचं अंडं देणारी कोंबडी आहे. पुढील महिन्यात असाच पाच हजाराचा हप्ता घेऊ.' असं म्हणून तो राक्षसासारखा हसू लागला. तोच धत्‌दिशी आवाज झाला. अन् दार उघडून दोन इन्स्पेक्टर, चार पोलिस अन् मिकाराम आत घुसले.

'पकडा या गुंडांना' मिकाराम ओरडला. पोलिसांनी पिस्तुल रोखून सर्वांना पकडले. मिकाराम मराठी बोलतोय हे पाहून गुंडांचा प्रमुख म्हणाला, 'अरे इंग्लिस पोरटं मराठी बोलतंय. काय तुकाराम ही काय भानगड?'

तुकाराम ऊर्फ अभिजित हसत म्हणाला, 'ही आमची 'च'ची भाषा. चमतग चणतातम्ह चलाह्या (ह्याला गंमत म्हणतात) काय मिकाराम?'

मिकाराम हसून म्हणाला, 'चयहो चयहो.'

अशा तऱ्हेनं तुकाराम–मिकारामने मुलं पळवणाऱ्या गुंडाच्या टोळीला पकडून दिले.

# १० खबरदार....हात लावशील तर....

'अरे, घरातल्या घरात पैसे नाहीसे होताहेत म्हणजे काय?' माधवराव शिरा ताणून ताणून बोलत होतं. घरातलं वातावरण त्यामुळं तंग होतं.

त्याचं काय झालं....पंधरा दिवसांपूर्वीची हकीकत. 'स्वरांजली' अपार्टमेंटमधील पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या माधवरावांच्या घरातली गोष्ट. गेले काही दिवस माधवरावांच्या पाकिटातून अधूनमधून एखाद-दुसरी नोट गायब होण्याचा चमत्कार घडू लागला होता. नोट रुपया-दोन रुपयाचीच असायची म्हणून माधवरावांनी तिकडे लक्ष दिले नाही. आपल्याच हिशेबात काही गोंधळ असेल म्हणून त्यांनी तिकडे दुर्लक्ष केलं. पण परवा....

पंधरा एप्रिलला कहरच झाला. चक्क पाच रुपयांची एक तेलकट नोट गायब. विशेष म्हणजे त्या दिवशी त्यांनी पाकिटात सर्व नोटा मोजून ठेवल्या होत्या. तेव्हा चोर घरात वावरणारा असणार हे उघड होते.

'ते काही नाही. आज ह्या गोष्टीचा मी पुरा छडा लावणारच.' माधवरावांनी निर्धार व्यक्त केला. घरात इन-मीन-सहा माणसांचा वावर असायचा. एक माधवराव, वनिता मंडळाच्या बालिकाश्रमात शिकणारी त्यांची पत्नी सुमन, राजेश व अनिता ही दोन मुले व बाहेरचे पण घरात वावणारा म्हणजे रामा गडी व मोलकरीण. माधवराव भडकले होते तेव्हा सगळेच घरात होते. चोराचा शोध घेण्यासाठी ते पुढचं पाऊल टाकणार तोच आतल्या खोलीतून राजेश धावत धावत बाहेर आला अन्

घरातल्या वातावरणाची काहीच कल्पना नसल्याने उल्हसित मनाने म्हणाला,

‘ बाबा, ही पाहा माझ्या नाटकाची कॅसेट, तुम्ही ऐकणार ? ’

‘ दे फेकून तुझी ती कॅसेट ’ असं म्हणत माधवरावांनी राजेश दाखवत असलेली कॅसेट चक्क फेकून दिली.

कॅसेट जमिनीवर आपटून फुटली. टेपची गुंडाळी तुटून बाहेर आली. राजेशने रडत रडत ती कॅसेट उचलली. तेवढयात राजेशची आई आतल्या खोलीतून हातात पाच रुपयांची नोट घेऊन आली. ‘ अहो, ही तर नाही तुमची नोट ? ’

‘ हो, हीच. तेलकट आहे ना ? म्हणजे तीच, कुठं सापडली तुला ? ’ राजेशच्या बाबांनी विचारलं.

‘ उंदराने केलेल्या बिळाच्या तोंडाशी. मी तुम्हाला उंदरांचा बंदोबस्त किती दिवस करायला सांगत्येय. पण तुम्ही ऐकाल तेव्हा ना. ’ सुमनताईंनी बोलणं संपवलं तोच त्यांचं लक्ष रडणाऱ्या राजेशकडे गेलं.

‘ काय झालं रे राजू ? ’ सुमनताईंनी त्याला मायेनं जवळ घेत विचारलं.

‘ किनई आई, शिवरायांच्या जयंतीनिमित्त आमच्या शाळेत स्वराज्याचा कानमंत्र ’ हे नाटक आम्ही बसवत आहोत. त्यातील माझे संवाद टेप केले होते अन् बाबांना ते ऐकवणार होतो. परंतु बाबांनी कॅसेट फेकून दिली. ही बघ तुटलेली, खराब झालेली टेप. ’ राजूने रडत रडत सगळी हकीकत सांगितली.

'अरे, त्यांच्या पाकिटातून पैसे नाहीसे होताहेत म्हणून ते वैतागले आहेत. कधी आहे नाटक तुझं ?'

'पाच मे रोजी' राजू.

'अरे, म्हणजे आलीच की पाच तारीख. ती टेप जोडून जमतंय का पाहा. नाहीतर उद्या मला म्हणूनच दाखव तुझे संवाद.' त्या दिवशी राजूने ती टेप जोडण्याचा प्रयत्न केला. टेप जुळली पण संवाद अर्धवट, तुटक तुटक अधूनमधून ऐकायला यायचे.

त्यानंतर दोन दिवसांनी एका रात्रीची हकीकत. सगळे डाराडूर झोपले होते. राजूदेखील ती टेप अधिक चांगल्या तऱ्हेने जोडण्याचा प्रयत्न करीत झोपी गेला. तोच अंधारात कुणी व्यक्ती घरात शिरली. तो चोर. त्याने घरात काही शोधाशोध सुरू केली. तेवढ्यात राजूचा हात टेपरेकॉर्डवर पडला अन् टेपरेकॉर्डर सुरू झाला.

चोराने माधवरावांचे पाकीट उचलण्याचा प्रयत्न केला अन् टेप-रेकॉर्डमधून शब्द बाहेर पडले.

'खबरदार ! हात लावशील तर' चोराने घाबरून पाकीट टाकले. अन् तो पळून जाणार तोच त्याच्या कानी शब्द आले.

'अरे भ्याडा, माझ्या तावडीतून कसा निसटशील तू.'

चोर घाबरला. धावत धावत तो माधवरावांच्या कॉटजवळ गेला. त्यांचे पाय धरून म्हणाला, 'साहेब, मी चुकलो, पाया पडतो.' माधवराव उठले. त्यांनी दिवा लावला. पाहतात तो रामा रडत त्यांच्या पाया पडत होता.

'अरे, आता पाया पडून काय उपयोग ? त्यावेळी नाही तुला याद आली.'

'साहेब चुकलो. कोणी तरी मला बघितलं.' माधवरावांनी पाहिलं तर राजूच्या कुशीतल्या टेपरेकॉर्डरमधून ते शब्द बाहेर पडले. त्यांनी टेपरेकॉर्डर बंद केला. राजूला उठवलं. सगळ्यांना हाक मारली. राजेश-मुळं चोर सापडला होता.

आता पाच मे रोजी राजेशचं शिवरायाच्या कथेरील नाटक धम्माल उडवणार हे सांगायला पाहिजे का ?

## ११ तोतरा बाळू म्हणे, ' मी येऊ ? '

एकतीस डिसेंबर एकोणीसशे ऐंशीची संध्याकाळ. गाव उल्हासवाडी. तालुक्याचं गाव. गावात नगरपरिषदेची शाळा. शाळा नुकतीच सुटलेली. शाळेतील काही मुले गावाबाहेरील पटांगणात खेळण्यासाठी जमली होती. पण कुणीच कसला खेळ सुरू केला नव्हता. सगळे कोमेजलेल्या चेहऱ्याने गप्प बसले होते. सगळ्यांच्या तोंडावर कसल्या तरी चिंतेची काळजी दिसत होती. शेवटी बंड्याने ह्या शांततेचा फुगा फोडीत म्हटले, ' आज वर्ष झालं. आंतरराष्ट्रीय बालक वर्षाचा आज शेवटचा समारोपाचा दिवस. हे पटांगण, केवळ मुलांसाठी राखून ठेवण्याचं आश्वासन आपल्याला दिलं होतं.

त्याची री ओढत चंद्या म्हणाला होता, ' समारंभासाठी कोणी प्रतिष्ठित मंत्री आले होते. ते म्हणाले होते, ' मुलं म्हणजे देवाघरची फुलं. ' ह्या फुलांना उमलण्यासाठी, फुलण्यासाठी ग्रामपंचायतीत ही जागा मुलांच्या मैदानासाठी ठेवली जाईल असं मी आश्वासन देतो. '

मंत्र्याच्या आवाजाची नक्कल करीत चंद्याच्या त्या भाषणावर मुलांमध्ये हशा पिकला. गुंडू म्हणाला, ' काय चुकलं रे त्याचं. नाही तर त्यांनी केवळ आश्वासन दिलं. आश्वासन पाळायला त्यांचं नाव हरिश्चंद्र थोडंच आहे. त्यांचं नावं आहे, ना. मा. निराळे. ' पुन: एकदा खसखस पिकली. तोच बाळू म्हणाला, ' म .... ला .... वा .... वाटतं आपण मो .... मोर्चा .... काढू या. ' पायानं लंगडा, हाताने अधू , जिभेने तोतरा बाळू म्हणजे पेंद्याचा अवतार; पण डोक्याने भारी हुशार. त्याची कल्पना सर्वांना पटली. सगळ्यांनी त्याला उचलून घेतले अन्....

' आम्हाला खेळायला जागा द्या. '

' मुलांसाठी पटांगण मोकळे ठेवा.'

अशा घोषणा देत ग्रामपंचायतीकडे लगेच मोर्चा काढला.

ग्रामपंचायतीत त्यावेळी गावचे सादबा पाटील, सरपंच शिंदे, कुलकर्णी, तलाठी, ग्रामसेवक अशी बरीच मंडळी जमली होती. त्यांची बैठकच चालू होती. गावची ' ती ' जागा मुंबईच्या कुठल्याश्या कारखान्याला द्यायचा विचार चालू होता.

तलाठी म्हणाला, ' सरपंच, ती जागा तुमची. तेव्हा तुम्हीच निर्णय घ्यायचा. जागेचे तुम्हीच मालक आहात.' सरपंचाची चमचेगिरी करणारा ग्रामसेवक म्हणाला, ' अन् आता काय ते बालक-वर्ष संपून गेलंय.'

तोच ह्या बालचमूचा मोर्चा तेथे येऊन थडकला.

' आम्हाला खेळायला जागा द्या.'

हा नारा ऐकून सरपंच उठले. त्या बालसेनेला सामोरे जात ते म्हणाले, ' मुलांनो, मला ठाऊक आहे तुमची अडचण. म्हणून तर मी ही बैठक बोलावली आहे. तुमची व्यवस्था मी करीनच. तुम्ही निश्चिंतच राहा.' बाळू अडखडत बोलला, ' मो – ठी माणसं आ .... आपला शब्द पाळतात. आम्हाला ती .... तीच जागा पाहिजे.'

' चूप रे बोबड्या ' पाटील बाळूवर खेकसले. पाटलांना अडवीत सरपंच म्हणाले, ' पाटील, बोलू द्या त्याला. अन् खरं सांगा, काय बरं चुकलं त्याचं. आपण एकदा कबूलं केलंय. आपणच शब्द फिरवला, तर ह्या पोरांपुढं आदर्श कुणाचा ? ' सरपंचानी तसं सुनावल्यावर पाटील गप्प झाले.

' बाळांनो, गावाच्या विकासासाठी इथं कारखाना होणं जरुरीच आहे. त्याबरोबर तुमच्या आशा तुडवणार नाही याची खात्री बाळगा.'

'सरपंचाचा जयजयकार असो' असा जयघोष करीत मुले घरोघर परतली. त्यानंतर काही महिने लोटले. मुंबईच्या कारखानदाराशी सरपंचांचा पत्रव्यवहार चालू होता. मुलांसाठी पटांगण मोकळे ठेवून कारखाना सुरू करता येईल का ? त्याबद्दल पर्यायी काय योजना करावी ? हे सरपंच पत्रातून विचारीत होते. तर कारखानदाराला पटांगण मोकळे ठेवून कारखाना सुरू करणे अडचणीचे वाटत होते.

तेवढ्यात गावाच्या जत्रेचे दिवस जवळ येऊन ठेपले. कुस्त्यांचा फड; देवीच्या रथाची यात्रा, काही स्पर्धा, सामने त्या निमित्ताने होत असत.

यंदा सरपंचाने एक अभिनव स्पर्धा जाहीर केली. 'जो कोणी सगळ्यात उत्तम थाप मारेल त्याला तो ते मागेल ते द्यायचं' सरपंचांनी जाहीर केलं.

'ढांग ची ढांग' अशी हलगी वाजवीत गावचा तराळ गावात सगळी-कडे दवंडी वाजवीत हिंडला. जत्रा पाच नोव्हेंबरला होती. तोपर्यंत अगर त्या दिवशी उत्कृष्ट थाप मारायची होती. मात्र त्याला एक अट होती. ती म्हणजे कोणाचे नुकसान झाले नाही पाहिजे, असे बंधन होते. गुंडू, बंडू, चंदू , अन् बाळू कंपनीने ती दवंडी ऐकली. बाळूच्या डोक्यात एक भन्नाट कल्पना येऊन गेली. तो सर्व मित्रांना भेटला अन् त्यानं ती मस्ताड आयडिया सगळ्यांना ऐकवली. सर्वांनी मग बाळूला छानशी टाळी दिली.

दवंडीच्या दिवसापासून एक दुसऱ्याला नकळत बंडल मारण्याचा प्रयत्न करू लागला. आता एखाद्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवणे कठीण जाऊ लागले. त्यात गावावर विचित्र संकट आले. गावात 'म्हणे हाकामारी' आली.

'हाकामारी' म्हणजे एक प्रकारची चेटकीण, हडळ. रात्री, अपरात्री ती गावात हिंडू लागली. कुणाच्याही घरासमोर जाऊन ती उभी राहायची अन् हाक मारीत म्हणायची, 'मी येऊ?'

अशा वेळी म्हणे गप्प बसायचे असते. जर का तिला 'ये' म्हटले, तर त्या मुलाला, माणसाला ती कुठं तरी गुहेत घेऊन जाते अशी खेड्यात समजूत आहे.

'हाकामारी आली', 'हाकामारी आली' एक दुसऱ्याला, दुसरा तिसऱ्याला सांगू लागला. सगळा गाव घाबरून गेला. कोणी सांगायचा तिला शिंगं आहेत. कुणी म्हणायचा तिचे पाय उलटे आहेत. ती लांबसडक केस मोकळे सोडून काळे कपडे पांघरून हिंडते. असे सारे गावकरी म्हणू लागले. काय करावे कोणाला कळेना.

सरपंच म्हणाले, 'आपण देवीला साकडे घालू. नवस बोलू. जत्रेच्या दिवसापर्यंत ही बया गावाबाहेर जाऊ दे असे मागणे मागू.' सगळ्यांना विचार पसंत पडला. सरपंच मनोमन नवस बोलले.

जत्रेचा दिवस उजाडला. मिठाईची, खाऊची दुकाने, खेळण्याचे स्टॉल्स मांडले गेले. पाळणे, चक्रवाई आले. देवीला नारळाची तोरणे बांधण्यात येऊ लागली. सरपंच, पाटील व गा‍ची प्रतिष्ठित मंडळी एका मांडवात गाद्यावर लोडाला टेकून बसली होती. आता थापा ऐकवण्याचा कार्यक्रम सुरू झाला.

महादा म्हणाला, 'मी गणपाचा भाऊ 'गेला' म्हणून थाप मारून गणपाला खूप पळवला.'

तेवढ्यात दाढीवाला नवा पोस्टमन 'तार' म्हणत पाटलाच्या हाती एक कागद देऊन त्यांची सही घेऊन गेला. पाटलांनी कागद वाचला. त्यात लिहिले होते—

'पाटील, मी खरा पोस्टमन नव्हे.
मी तुमचा पुतण्या. वेष बदलून
मी तुम्हाला फसवले. बक्षीस द्या मला.'

ती थाप ऐकून सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. तोच गुंड्या धावत पळत तिथे आला अन् घाबरत म्हणाला,

'पाटील हाकामारी सापडली. पोरांनी पकडून ठेवलंय. धावा, पळा.'

गुंड्याचे बोलणे ऐकून बायका किंचाळल्या. कुणी घाबरले. कुणी पळाले. सरपंच, पाटील मात्र सोबत गड्यांना काठ्या, कुऱ्हाडी घेऊन निघाले. सर्व जण गुंड्यामागोमाग गेले. गुंड्यांनी सर्वांना त्या पटांगणात आणले. तेथे झाडाला एका व्यक्तीला बांधले होते. त्या व्यक्तीच्या अंगावर पूर्णतया काळा पोशाख व बुरखा होता.

सरपंच म्हणाले, 'कोण ही हाकामारी? काढा बुरखा तिचा.'

लोकांनी विचकत, दचकत बुरखा दूर केला. पाहतात तर काय ती व्यक्ती दुसरी-तिसरी कोणी नसून तोतरा बाळू होता.

'बाळ्या तू?' ओरडत पाटील पुढे धावले.

'थांबा पाटील, असे उतावीळ होऊ नका. त्याला नीट काय ते विचारा.' सरपंच म्हणाले. बाळूला मोकळे केले.

तेव्हा तो सांगू लागला, 'मी .... मी म्हणजे आम्ही मुलांनी था.... थापांचं बक्षीस जिंकायचं ठरवलं.' बाळूला मध्येच थांबवीत गुंडू म्हणाला, 'मी नीट सांगतो. अन् मग आम्ही खोटी 'हाकामारी' गावात आणली. रात्री बुरखा पांघरून आम्ही 'मी येऊ?' असे रोज एकाच्या घरासमोर म्हणू लागलो. आवाज निरनिराळे म्हणून कोणी ओळखलं नाही. शिवाय हा टेपरेकॉर्डर '....म्हणत गुंडूने एक टेपरेकॉर्डर दाखवला अन् म्हणाला,

'यावर थोड्या थोड्या अंतरावर 'मी येऊ?' टेप केलंय.' गुंडूने टेपरेकॉर्डर वाजवून दाखवला. लोकांनी टाळ्या वाजवल्या.

सरपंच म्हणाले, 'हाकामारी गेली. काय बक्षीस देऊ बोला?'

मुलं म्हणाली, 'मुलांसाठी खेळायला जागा.' तोच तिथे एक फियाट गाडी आली. त्यातून मुंबईच्या कारखानदाराचा माणूस उतरला व म्हणाला,

'साहेबांनी पटांगणासाठी जागा ठेवून कारखान्यास मंजुरी दिलीय' ते ऐकून सर्वांनी जल्लोष केला.

'मुलांनो, कालच त्या पटांगणास 'चाचा नेहरू क्रीडांगण' हे नाव देण्याचा कार्यक्रम थाटामाटात झाला.'

[illegible]
BVBK-0401594